महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारित ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १६ अंकः ८ पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २० मे २०२५ ते सोमवार २६ मे २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301


# राज्यात पुनः एकदा कोरोनाचा शिरकाव

## केईएम रुग्णालयात २ संशयित कोरोनाबाधितांचा मृत्यू

■ मुंबई : विशाल कारंडे

**सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये करोना विषाणूने पुन्हा एकदा डोकं वर काढलेय. दोन्ही शहरांमध्ये कोरोना रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्यामुळे जगभरात पुन्हा एकदा कोरोनाच्या लाटेचा धोका निर्माण झालाय. त्यातच आता मुंबईमधूनही चिंतेची बातमी समोर आलेली आहे. मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये संशयित करोनाबाधित दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.**

या दोन्ही रूग्णांचा मृत्यू कोरोनामुळे झाला नसून त्यांना असलेल्या इतर आजारांमुळे झाल्याचे रूग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. पण दोन रूग्णांच्या मृत्यूनंतर प्रशासन अलर्ट झालेय. मृत झालेल्या दोन्ही रूग्णांना कोरोनाची लक्षणे दिसत होती, त्यामुळे केईएम रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते. पण उपचारावेळीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात पुन्हा एकदा कोरोनाच्या भीतीने चिंता निर्माण झाली आहे. केईएम रुग्णालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे दोन्ही रुग्ण गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल झाले होते. त्यांना ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे होती.



त्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, त्यांचा अहवाल अद्याप मिळालेला नाही. संशयित दोन्ही कोरोना रुग्णांना आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर योग्य उपचार सुरू होते. परंतु त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना वाचवणे शक्य झाले नाही, असे केईएम रुग्णालय प्रशासनाने सांगितले. मुंबई महानगरपालिकेने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. रुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू केले आहे. तसेच, नागरिकांना मास्क वापरणे, सामाजिक अंतर पाळणे आणि हात धुणे यासारख्या गोष्टी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने सुचवले आहे. ज्येष्ठ अभिनेत्री शिल्पा शिरोडकर यांना करोनाची लागण झाली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली आहे. हेल्थ अपडेट दिल्यानंतर शिल्पा यांचे चाहते चिंतेत आहेत. हिंदी बिग बॉस १८ मध्ये शिल्पा शिरोडकर झळकल्या होत्या. भारत-पाकिस्तान तणावानंतर आयपीएल एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आले होते.

(शेष पृष्ठ २ वर)

# मुंबई लोकलला आणखी आर्थिक बळ, महत्त्वाचे प्रकल्प आता मार्गी लागणार

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबई महानगर क्षेत्रात अतिशय महत्त्वाचा असलेल्या मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्पाला रेल्वे मंत्रालयाच्या २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात १७७७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आता मुंबई लोकलला अधिक बळ येणार असून प्रवाशांची गैरसोयदेखील आहे. दरम्यान, राज्य शासनही तितकीच रक्कम त्यासाठी देणार आहे. यामुळे एकूण निधीचा पुरवठा दुप्पट होऊन या क्षेत्रातील कनेक्टिव्हिटी वेगाने सुधारेल आणि प्रवाशांना अधिक सुविधा मिळतील, असा दावा मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशनने केला आहे. एमयूटीपी - १ मध्ये नऊवरून बारा डब्यांच्या उपनगरीय गाड्या सुरू करण्यात यापूर्वीच यश



टाळणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रामधील पायाभूत वाहतूक व दळणवळण सेवा सुधारण्यासाठी एम.एम.आर. डी.ए.ने मांडलेला एक प्रकल्प आहे. या प्रकल्पाअंतर्गत मुंबई लोकल अधिक वेगवान व आरामदायी व्हावी यासाठी विविध प्रकल्प राबवण्यात येत आहेत. अर्थसंकल्पात MUTP साठी अधिक अर्थसहाय्य दिल्याने आता प्रकल्पाचा वेगही वाढणार आहे. मागील वर्षीच्या ७८९ कोटींच्या तुलनेत यंदा हा निधी १२५ टक्क्यांनी वाढला आले आहे. त्यातून बोरिवली-विरार आणि कुर्ला-ठाणे या जादा मार्गिकाही सुरू करण्यात आल्या आहेत. एमयूटीपी-२ मध्ये सर्व डीसी गाड्यांचे एसीमध्ये परिवर्तन करण्याचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. ठाणे-दिवा दरम्यान पाचवी, सहावी मार्गिका सुरू झाली आहे, त्याचप्रमाणे या टप्प्यात सीएसएमटी-कुर्ला मार्गावर पाचवी, सहावी मार्गिका आणि मुंबई सेंट्रल-बोरीवली सहाव्या मार्गिकेचे काम वेळेत पूर्ण करण्यात येणार आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

# राज्यातील सर्व खाजगी पूर्व-प्राथमिक शाळांसाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य

■ ठाणे : संजय बोडके

जिल्ह्यातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी शैक्षणिक संस्थांसाठी शालेय



नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. ही नोंदणी राज्य शासनाच्या Pre-School Registration Portal (ECCE) वर करावी लागणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषद ठाणेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी एका अधिकृत पत्राद्वारे दिली आहे. पूर्व प्राथमिक शाळा, नर्सरी, लहान शिशू (जूनियर केजी), मोठा शिशू (सीनियर केजी) अशा कोणत्याही स्वरूपात शिक्षण देणाऱ्या खासगी केंद्रांनी आपली नोंदणी

(शेष पृष्ठ २ वर)

# कोणीतरी माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतोय, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ ठाणे : तृप्ती गोरे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाण्यातील एका कार्यक्रमात उपस्थित होते. या कार्यक्रमात सातत्याने त्यांच्या भाषणावेळी माईक बदलले जात होते. यावेळी एकनाथ शिंदे हे मिश्किलपणे म्हणाले, कोणीतरी माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतोय, एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्याने सभागृहात एकच हशा पिकला. माझा आवाज जनतेचा आवाज आहे, तो कोणीही बंद करू शकणार नाही



असे म्हणताच, सभागृहातील उपस्थितांनी टाळ्यांचा वर्षाव केला. गिर्यारोहक लेखक शरद कुलकर्णी यांच्या अनुभवावर आधारित 'ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता.

(शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### नवी मुंबई विमानतळाचे स्वातंत्र्यदिनी उद्घाटन

■ नवी मुंबई : वृत्तसंस्था

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा जून महिन्यात सुरू करू, अशी घोषणा अदानी उद्धयोगसमूहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी यांनी केली होती. परंतु विमानतळाचे काम पूर्ण झाले नसल्याने आता आणखी दीड महिना विलंब होण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे उद्घाटन करण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. दोनपैकी एका धावपट्टीचे



काम पूर्ण झाले असून विमान उड्डाणाच्या चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. टर्मिनल इमारतीमध्ये बोर्डिंग पास (तिकीट) काऊंटर यंत्रणासुद्धा तयार आहे. तर सध्या विमानतळ टर्मिनल इमारतीच्या प्रथम प्रवेशद्वाराचे काम सुरू आहे. लंडन येथील एका नामवंत कंपनीने या विमानतळाच्या टर्मिनल इमारतीच्या प्रवेशद्वाराचे अनोखे संकल्प चित्र रेखाटले. मात्र या आकर्षक संकल्प चित्रात रेखाटल्याप्रमाणे प्रवेशद्वारा वरील कलाकृतीमध्ये ६० ते ७० मीटर उंचीवर ॲल्युमिनियमची प्लेट जोडणी करणे हे सर्वात जोखमीचे काम आहे.

# गृह विभागाचा मोठा निर्णय; हवालदार, पोलीस शिपायांनाही गुन्हे तपासाचा अधिकार

■ मुंबई : मेहुल गायकवाड

राज्याच्या पोलीस दलातील अपुरे संख्याबळ आणि वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणेवर पडणारा ताण पाहून आता पोलीस हवालदार व पोलीस शिपायांनाही गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. अर्थात तपासाचे हे अधिकार देण्यासाठी पदवीधर व सात वर्षे सेवा पूर्ण झाल्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत. गृह विभागाने राजपत्र जारी करीत सर्व पोलीस ठाण्यांना या संदर्भातील आदेश दिले आहेत. हे अधिकार देताना गृह विभागाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या अधिसूचनेत बदल करण्यात आले आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, पोलीस यंत्रणा अपुरी पडत आहे. ग्रामीण भागात अपुर्याय मनुष्यबळाबरोबरच अधिकार्यांघची संख्याही कमी आहे. एकाच



अधिकार्यातकडे अनेक गुन्ह्यांचा तपास दिला जात असल्याने अधिकार्यांचवरील ताण वाढला आणि गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण घटले. या पार्श्वभूमीवर गृहखात्याने पोलीस हवालदार व पोलीस शिपायांना तपासाचे अधिकार दिले आहेत. गुन्ह्यांच्या तपासाची जबादारी पोलीस हवालदार आणि पोलीस शिपायांवर देण्यात आली असली तरी मात्र शिपायांसाठी गृह विभागाने काही अटी घातल्या आहेत. पोलीस शिपाई हा पदवीधर असावा, त्याने ७ वर्षे पोलीस शिपाई म्हणून सेवा केलेली असावी. तसेच नाशिक येथील गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयातून सहा आठवड्याचे विशेष प्रशिक्षण पूर्ण केलेला व प्रशिक्षणात घेतलेली परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. त्याच्याविरोधात कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी, अशा अटींची पूर्तता करणार्या पोलीस शिपायालाच गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार मिळणार आहे.

# राज्य सरकारचा सर्वात मोठा 'डिजिटल स्ट्राईक'; १८ लाख रेशन कार्ड रद्द

■ मुंबई : गणेश बागडे

**रेशन कार्डला आधार क्रमांक लिंक करण्यासाठी केंद्र सरकारने ई-केवायसी मोहीम राबविली आहे. रेशन कार्ड धारकांनी ई-केवायसी न केल्यास शिधापत्रिका रद्द करण्याचा इशारा देण्यात आला होता. तरीदेखील महाराष्ट्रातील तब्बल १ कोटी ६५ लाख ३३ हजार ९५६ रेशन कार्डधारकांनी ३० एप्रिलची मुदत संपूनही केवायसी केलेली नाही.**

नागरिकांनाही सहजपणे रेशन कार्ड मिळत आहेत. रेशन विभागाच्या भ्रष्ट कारभारामुळे रेशन कार्ड सहजपणे देशभरातील कुठल्याही राज्यातील नागरिकांना उपलब्ध होत आहेत. उलट ८०६ रेशन कार्ड धारकांपैकी ५ कोटी २० लाख ६२ हजार ८५० रेशन कार्डचे ई-केवायसी पूर्ण झालेले आहे. मात्र, त्या सगळ्यांच्या कागदपत्रांची तपासणी अद्याप पूर्ण झालेली नाही. ज्या रेशन कार्डच्या



धक्कादायक म्हणजे ई-केवायसी केलेल्या कागदपत्रांच्या छाननीनंतर राज्यभरातील तब्बल १७लाख ९५ हजार ५५३ रेशन कार्ड विविध कारणास्तव रद्द करण्यात आले आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ४ लाख ८० हजार २८ रेशन कार्ड हे एकट्या मुंबईतील आहेत. मुंबई, ठाणे जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर बनावट कागदपत्रांच्या आधारे रेशन कार्ड काढण्यात आलेले आहेत. त्यात बांगला देशी स्थानिकांना रेशन कार्ड काढताना कागदपत्रांच्या नावाखाली अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे केंद्र सरकारने रेशन कार्डला आधार कार्डचा क्रमांक जोडण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी दोनदा मुदतवाढही देण्यात आलेली होती. आता ३० एप्रिलपर्यंत ई केवायसी करण्याची अंतिम मुदत होती. महाराष्ट्रातील ४२ जिल्हे तसेच रेशन विभागांमधील ६ कोटी ८५ लाख ९६ हजार ई-केवायसीच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी तब्बल १७ लाख ९५ हजार ५५३ रेशन कार्ड विविध कारणास्तव रद्द करण्यात आले आहेत. अद्याप १ कोटी ६५ लाख ३३ हजार ९५६ कार्डधारकांची ई-केवायसी व्हायची असून, त्यांच्या कागदपत्रांची तपासणीही होणार आहे. मुंबई पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक रेशन कार्ड रद्द झालेले आहेत.

(शेष पृष्ठ २ वर)

# नवी मुंबईत १५ दिवसांसाठी ड्रोन कॅमेऱ्यांना बंदी

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबईत ड्रोन बंदी आदेश देण्यात आले आहेत. सागरी किनाऱ्यावर हे आदेश कायम असतात. मात्र पहलगाम येथील हल्ल्यानंतरची परिस्थिती पाहता सुरक्षा म्हणून ही बंदी आयुक्तालय क्षेत्रात घालण्यात आली आहे. या आदेशाचे काटेकोर पणे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पहलगाम येथे झालेला अतिरेकी हल्ला आणि त्याला भारताने सडेतोड उत्तर दिल्यानंतर दोन्ही देशांदरम्यान शस्त्रविराम आहे. मात्र सुरक्षाविषयक सतर्कता बाळगली जात आहे. आजच्या



सॅटेलाईट तंत्रज्ञान काळात असे हल्ले करण्यास ड्रोनचा वापर केला जाऊ शकतो त्यामुळे ठाणेपाठोपाठ नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ड्रोन कॅमेराला बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ११० किलोमीटर सागरी किनारा आहे. यात ऐरोली ते वाशी- करावे एनआरआय, खारघर उरण ते घारापुरी लेणी हा परिसर नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतो. या क्षेत्रात ड्रोन कॅमेरा बंदी कायम असते. मात्र पहलगाम हल्ल्यानंतर पूर्ण पोलीस आयुक्तालंय क्षेत्रात ड्रोन कॅमेराला बंदी घालण्यात आली आहे. काही अघटित घडू नये म्हणून ड्रोन बंदी घालण्यात आली आहे. खासगी समारंभ वा हौस म्हणून ड्रोन कॅमेराचा वापर केला जातो. मात्र त्यामुळे भीती आणि पाठोपाठ अफ़वा पसरून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. त्यामुळे ही बंदी घालण्यात येते. जर कोणी या आदेशाचे उलंघन केले तर कायाद्यानुसार गुन्हा नोंद करून कारवाई केली जाईल.

# मुंबईतील १३४ इमारती धोकादायक, सर्वाधिक धोकादायक इमारती गोरेगाव आणि वांद्रे पश्चिममध्ये

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

मुंबई महापालिकेने दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्याच्या तोंडावर अतिधोकादायक इमारतींची यादी तयार केली आहे. मुंबईत एकूण १३४ अतिधोकादायक खासगी इमारती आहेत. यामध्ये पश्चिम उपनगरात सर्वाधिक इमारती आहेत. सर्वाधिक धोकादायक इमारती गोरेगाव आणि वांद्रे पश्चिम परिसरात आहेत. गेल्या काही वर्षांपासून मुंबई महापालिकेने केलेल्या कारवाईमुळे मुंबईतील खासगी धोकादायक इमारतींची संख्या कमी होऊ लागली आहे. मुंबईत एकेकाळी धोकादायक इमारतींची संख्या मोठी होती. त्यामुळे पावसाळ्यात धोकादायक इमारत पडून दुर्घटना होण्याचे प्रमाणही अधिक होते. काही वर्षांपूर्वी पालिकेने धोकादायक इमारती पाडून टाकण्यासाठी सुनिश्चित कार्यपद्धती हाती घेतली होती. त्यानुसार केलेल्या कारवाईला यश येत असून मुंबईत सध्या केवळ १३४ धोकादायक इमारती उरल्याचा दावा पालिका प्रशासनाने आकडेवारीद्वारे केला आहे. दरम्यान, मुंबईतील १३४ धोकादायक इमारतींपैकी ५६ इमारतींची प्रकरणे न्यायालयात आहेत. तर १२ इमारतींच्या संरचनात्मक अहवालाबाबत रहिवाशांचे आक्षेप असल्यामुळे या इमारतींचे अहवाल तांत्रिक सल्लागार समितीकडे आहेत. त्यामुळे या १३४ इमारतींपैकी ७७ धोकादायक इमारतीत अद्याप रहिवाशांचे वास्तव्य आहे. या धोकादायक इमारती रिकाम्या करून पाडून टाकणे हे पालिकेपुढचे मोठे आव्हान आहे.




दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर मुंबईतील खासगी इमारतींचे सर्वेक्षण केले जाते. तत्काळ पाडून टाकणे आवश्यक असलेल्या अतिधोकादायक इमारती सी वन श्रेणीत समाविष्ट करण्यात येतात. अशा इमारतींची यादी मुंबई महापालिकेतर्फे जाहीर केली जाते. त्यापैकी काही इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. दरवर्षी यापैकी काही इमारती पाडून टाकल्या जातात. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून या धोकादायक इमारतींची संख्या कमी होत आहे.

पालिकेच्या धोरणानुसार ३० वर्षे जुन्या इमारतींची संरचनात्मक तपासणी केली जाते. त्यात धोकादायक आढळणाऱ्या इमारतींमधील घरे रिकामी करण्यासाठी नोटीस बजावली जाते. इमारत धोकादायक ठरवण्याबाबत रहिवाशांचे काही आक्षेप असल्यास ते न्यायालयात किंवा त्यांना इमारत धोकादायक वाटत नसेल तर ते पालिकेच्या तात्रिक समितीकडे धाव घेतात. त्यामुळे त्या इमारती पाडता येत नाहीत. तसेच एखाद्या इमारतीच्याबाबत न्यायालयाने स्थगिती आदेश दिला तरी ती इमारत पाडून टाकता येत नाही.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स







## धारावीकरांचे डम्पिंग नको!

देशाच्या आर्थिक राजधानीत असलेली धारावी झोपडपट्टी ही आशियातली सगळ्यात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखली जाते. पुढच्या काही वर्षांमध्ये धारावीची ही बदनामीकारक ओळख पुसली जाण्याची शक्यता आहे. कारण धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास होऊ घातलाय. धारावीच्या पुनर्विकासाचे कंत्राट अदानी प्रॉपर्टीजला मिळाले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरुवातीपासूनच वादग्रस्त राहिलाय. परंतु, जेव्हापासून अदानी समूहाचे नाव धारावीशी जोडले गेलेय, तेव्हापासून धारावी पुनर्विकास योजनेतील वादही मोठे होऊ लागलेत.

धारावीतील रहिवाशांच्या घरांसाठी देवनार कचराभूमी अर्थात डम्पिंग ग्राऊंडची काही जागा दिली जाणार आहे. एकीकडे मुंबईत डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे, हायकोर्टाने कांजूरमार्गची जागा वनक्षेत्र घोषित केलीय, मालाड, मुलुंडचे डम्पिंग ग्राऊंड आधीच बंद झालेत, त्यामुळे मुंबईकरांचा रोज हजारो मेट्रिक टन कचरा टाकायचा कुठे असा महापालिकेला प्रश्न पडलाय. त्यातच देवनारची ही जागा अदानीला देण्यावर शिवसेना ठाकरे गटाचे युवा आमदार आदित्य ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. १३२ हेक्टरचा भूखंड असलेल्या देवनार डम्पिंग ग्राऊंडवर मुंबईतील दररोज सुमारे ५ हजार ५०० मेट्रिक टन कचरा



टाकला जातो, मात्र भविष्यात यामध्ये ७० ते ११० एकर जागा ही धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी तर, काही जागा वीज निर्मितीकरिता वापरण्यात येणार आहे.

डम्पिंग ग्राऊंडची ही जागा स्वच्छ करून राहण्यायोग्य करण्याकरिता मुंबई महापालिकेने २३६८ कोटी रुपयांचे टेंडर काढले आहे. ही जागा स्वच्छ झाल्यावर इथे सुमारे ५० हजार धारावीकरांचे पुनर्वसन होणार असल्याचे समजत आहे. या टेंडरला आदित्य ठाकरेंनी विरोध केला असून आधीच्या ४५०० कोटींच्या टेंडरवरून भाजपचे मंत्री आशिष शेलार यांनी ठाकरे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केलाय. हे आरोप-प्रत्यारोप तर सुरूच राहतील. कारण धारावीकरांच्या पुनर्विकासातील असंख्य अडचणींपैकी एकही अडचण सोडवण्यात ना सत्ताधारी, ना विरोधक यापैकी एकालाही रस नाहीय. धारावीकरांच्या नावावर फक्त राजकारण सुरू आहे.

मुंबईत नजर टाकाल तिथे पुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. त्यामध्ये काही प्रकल्प हे खासगी इमारतींचे तर काही एसआरएचे प्रकल्प आहेत. कुठलाही बांधकाम व्यावसायिक असो अधिकाधिक नफा कमावण्याच्या उद्देशानेच तो पुनर्विकास प्रकल्पांमध्ये हात घालतो. मोक्याची जागा आपल्या ताब्यात ठेवून मूळ रहिवाशांचे पुनर्वसन आड बाजूला करतो. अदानी समूहही काही वेगळा नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पा अंतर्गत केंद्र आणि राज्यातले भाजप सरकार धारावीच्या ५५० एकर जागेसह मुंबईतील मोक्याचे २ हजार एकरचे २० भूखंड अदानीला आंदण देणार आहे. त्यात मुलुंडमधील केंद्राच्या मालकीची मिठागरांची ५८ एकरची जागा अदानी समूहाला ३१९ कोटी रुपयांना देण्यात आलीय. शिवाय मुंबई महापालिकेच्या मालकीची जकात नाक्याची १८ एकरपैकी १० एकर, मुलुंड डम्पिंग ग्राऊंडची ४६ एकर आणि आता देवनार डम्पिंग ग्राऊंडची जागा, अशा विविध जागांचा यात समावेश आहे.

खुद्द मुलुंडमधील रहिवाशांनी धारावीकरांचे पुनर्वसन आमच्या जागेवर होता कामा नये असा इशारा दिला होता. तेव्हा लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार मिहिर कोटेचा, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुलुंडची एक इंचही जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देणार नाही, मूळ धारावीकरांना धारावीबाहेर काढणार नाही, असे आश्वासन दिले होते. परंतु, मुलुंडच्या या ५८ एकर मिठागरांच्या जागेवर राज्य सरकारने बॅनर लावून धारावीतील अपात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन येथेच होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. यावरून केवळ निवडणुकीत मते मिळवण्यासाठी भाजपने ही खोटी आश्वासने दिल्याचेही स्पष्ट झाले आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली धारावीकरांना मूळ जागेपासून कित्येक किमी दूर शहराबाहेर व डम्पिंग ग्राऊंडच्या हानिकारक जागेवर उचलून टाकण्याचा हा डाव म्हणजे धारावीकरांच्या आयुष्याशीच खेळण्याचा प्रकार आहे. चेंबूरच्या माहुल गावात मुंबई महापालिकेने प्रकल्पबाधितांसाठी शेकडो घरे उभारून ठेवलीय. परंतु माहुलचा हा संपूर्ण परिसर विषारी, प्रदूषणकारी आणि राहण्यास अयोग्य असल्याने येथे कुणीही प्रकल्पबाधित राहायला तयार होत नाही. येथील पुनर्वसनावरून मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेला झापले होते. तरी, महापालिका ही पडून असलेली घरे आपल्याच कर्मचाऱ्यांना स्वस्तात विकून त्यांचा जीव धोक्यात टाकतेय. डम्पिंग ग्राऊंडच्या जागेवरील पुनर्वसनही असेच घातक म्हणावे लागेल. धारावीत शेकडो मिनी इंडस्ट्रियल हब आहेत, असंख्य उद्योग, व्यवसाय येथे चालतात. हजारो, लाखो लोकांना त्यामुळे रोजगार मिळतो. कोट्यवधींचे देशी-परदेशी व्यवहार होतात. धारावीतील लोकांना इकडेतिकडे फेकून दिल्यावर हा इंडस्ट्रियल हबही उद्ध्वस्त होणार आहे. आहे तिथेच पुनर्वसन व्हावे या मागणीसाठी काही दिवसांपूर्वी एल्फिन्स्टन ब्रीजच्या प्रकल्पबाधितांनी आंदोलन केले होते. धारावीकरांनी याआधीच एक याचिका न्यायालयात दाखल केली आहे. लवकरच धारावीकर आपल्या विविध मागण्यांसंदर्भात पुन्हा मोर्चा काढण्याची शक्यता आहे. आहे त्याच जागेवर पुनर्वसन करा, एखाद्या कचऱ्याप्रमाणे डम्पिंग करू नका, अशीच धारावीकरांची सरकारकडून अपेक्षा आहे. मात्र सरकार या मागणीला सातत्याने केराचीच टोपली दाखवत आहे.

## स्त्रीत्वाचा अभूतपूर्व गौरव!

यंदा उन्हाळी सुट्टीत फिरायला जाण्याचे नियोजन केले. मुले मोठी झाली की तसेही शाळेच्या सुट्ट्यांच्या हिशोबानेच बाहेर जाणे होते. यंदा अमृतसरला जाण्याचे ठरवले. मेच्या पहिल्या आठवड्यात जायचे होतेष्ठत्यानुसार त्याची तयारी सुरू झाली. पण, ध्यानीमनी नसताना, २२ एप्रिलला पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. धर्म विचारून पुरुषांना कुटुंबीयांसमोरच गोळ्या घातल्या. देशभरात या हल्ल्याविरोधात संताप उसळला आणि सुरक्षेचे उपाय म्हणून देशभरातील महत्त्वाचे, प्रामुख्याने उत्तरेकडील विमानतळ बंद करण्यात आले. त्यामुळे सगळीच अनिश्चितता होती. ज्यांच्या माध्यमातून फिरायला जाणार त्यांनी मात्र नियोजनाप्रमाणेच सगळं होणार असल्याची खात्री दिली, आणि मनात धाकधूक घेऊनच आम्ही निघालो.

निघालो तोवर भारताने तातडीने कारवाई केली पाहिजे पासून काय कारवाई करायला हवी, ही आणि अशीच चर्चा सुरू होती. अमृतसरला पोहोचलो आणि दुसऱ्याच दिवशी वाघा-अटारी बॉर्डर पाहण्यासाठी गेलो. देशात नुकतीच घडलेली घटना, त्यामुळे असलेले संतापाचे वातावरण आणि या पार्श्वभूमीवर वाघा-अटारी बॉर्डरला दिलेली ही भेट हे फारच वेगळे होते. तिथल्या बीएसएफ जवानांची शिस्त, परेड, त्यांचा तो जोश हे सगळे – सगळेच अत्यंत अविस्मरणीय आहे.

या अटारी बॉर्डरवर ध्वज उतरवण्याचा कार्यक्रम पाहायला आलेल्या महिलांना आपल्या देशाचा तिरंगा हातात घेऊन धावण्याची संधी मिळते आणि नंतर तिथे देशभक्तीपर गाणी वाजतात, ज्यावर महिला आणि मुलांना ताल धरता येतो. ज्या मार्गावर बीएसएफचे जवान परेड करतात, तिथेच त्यांची परेड सुरू होण्यापूर्वी महिला अभिमानाने आपल्या देशाचा तिरंगा घेऊन धावतात. पाकिस्तानच्या दिशेने तो फडकवतात आणि परत फिरतात. आमच्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा हा क्षण होता. स्त्रीत्वाचा हा गौरवही मनाला फारच भावला. स्त्री-पुरुष समानता किंवा तत्सम चर्चा या सगळ्याच्या पलीकडे जाऊन महिलांना मिळालेला हा सन्मान खूप मोठा आहे.

अटारी बॉर्डरवर बीएसएफच्या जवानांची परेड असते त्यातही बहुसंख्य जवान या महिला आहेत. त्या भौगोलिक परिस्थितीनुसार ठेवण असलेल्या या महिला जवानांच्या गणवेशात फारच भारदस्त दिसतात. यातही पंजाब, हरयाणामधील महिलांचे प्रमाण जास्त असते आणि त्याचे कारणही फार महत्त्वाचे आहे. फाळणीच्या वेळी या भागातील लोकांवर झालेला अन्याय येथील लोक अजूनही विसरलेले नाहीत. अजूनही त्यांच्यामध्ये त्यावेळी झालेल्या अत्याचाराचा राग खदखदतो आहे. त्यामुळेच बीएसएफमध्ये त्यांचे प्रमाण जास्त असते आणि त्या आक्रमकही असतात.

वाघा-अटारी बॉर्डर पाहून आलो आणि त्याच मध्यरात्री किंवा दुसऱ्या दिवशी पहाटे भारताने आपल्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा चोख बदला घेतला. भारतीय जवानांनी ही मोहीम यशस्वी करून पाकिस्तानची झोप उडवली. या मोहिमेचं नावही किती समर्पकष्ठ तर ऑपरेशन सिंदूर! गेलेला माणूस परत येत नाही. पण केवळ या मोहिमेच्या नावानेही ज्या महिलांनी आपले पती पहलगाम हल्ल्यात गमावले त्यांना दिलासा मिळाला असेल.





दहशतवादी हल्ल्यात पती गमावलेल्या महिलांचे हे प्रतीक आहे. त्यामुळे पाकिस्तानमधील दहशतवाद्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी राबवलेल्या मोहिमेला भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव दिले. या मोहिमेतूनच भारतीय संस्कृतीत स्त्रियांना असलेले महत्त्व दाखवून देण्यासोबतच आमच्या बहिणींकडे वाकड्या नजरेने पाहाल तर त्याचे परिणाम काय होतील, हे देखील भारताने हिकमतीने दाखवून दिले.

या ऑपरेशन सिंदूरची अधिकृत माहिती देशभरातील जनतेला देण्यासाठी भारतीय लष्कराने एक मीडिया ब्रीफिंग घेतले. विशेष म्हणजे, यासाठी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्यासोबत भारतीय लष्कर आणि भारतीय हवाई दलाच्या दोन शूर महिला उपस्थित होत्या. या अधिकाऱ्यांनी देशासमोर लष्करी कारवाईबद्दल महत्त्वाची माहिती सादर केली. हा देखील भारतीय स्त्रीचा गौरवच आहे. अशा प्रकारच्या कारवायांची माहिती देण्यासाठी प्रामुख्याने लष्करातील पुरुष अधिकारीच असतात. पण, ही मोहीमच मुळात या हल्ल्यातील प्रियजन गमावलेल्या महिलांसाठी समर्पित असल्याने इथेही महिला अधिकाऱ्यांना घेण्याची समयसूचकता दाखवत भारताने सगळ्यांचीच मने जिंकली.

या मीडिया ब्रीफिंगसाठी महिला अधिकाऱ्यांची निवड करण्याचा निर्णय त्यांची अपवादात्मक लष्करी कामगिरी आणि नेतृत्व क्षमतेची दखल घेऊन घेण्यात आला. लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांचे त्यांच्या संबंधित शाखांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात, बहुतेक विवाहित महिलांनी त्यांच्या पतींना त्यांच्या डोळ्यांसमोर मृत्युमुखी पडताना पाहिले. अशा परिस्थितीत, या ऑपरेशनसाठी भारतीय सशस्त्र दलात महिलांचे योगदान इतरांपेक्षा थोडेही कमी नाही.

कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या एक मुस्लीम आणि एक हिंदू महिला लष्करी अधिकाऱ्यांना बोलण्याची जबाबदारी देऊन आपण एक राष्ट्र म्हणून थेट संदेश दिला. कारण पहलगाम हल्ल्यात पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या होत्या. त्याचाच बदला घेण्यासाठी हे ऑपरेशन राबवले आणि ते यशस्वी देखील करून दाखवले. भारतात महिलांचा सन्मान कसा होतो हे कळावं यासाठीच या महिला अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. देशाच्या दृष्टीने एवढ्या महत्त्वाच्या या मोहिमेत महिलांची ही निवड खूप काही सांगून जाते.

गेला आठवडा भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. तसा तर तो जगाच्या दृष्टीनेही महत्त्वाचाच होता. कोणीही येईल आणि टपली मारून जाईल, इतका कमकुवत भारत कधीच नव्हता आणि नसेल, याची जाणीव जगाला तातडीने करून देणे गरजेचे होते. जेणेकरून पुन्हा कोणीही अशी आगळीक करण्याचे धाडस करणार नाही. गेल्या आठवड्यात भारताने तेच अगदी बेमालूमपणे केले. भारताच्या या काटेकोर नियोजनावरून जगभरात त्यांची तारीफ झाली. पण यापेक्षाही कौतुक झाले ते या मोहिमेच्या अत्यंत समर्पक अशा नावाचे – ऑपरेशन सिंदूरष्ठ स्त्रीत्वाच्या या गौरवाने फारच छान वाटले. असाच एक गौरवाचा क्षण आम्ही देखील अटारी बॉर्डरवर अनुभवला, जो कायमस्वरूपी मनावर कोरला गेला आहे.

## अपयशाच्या भीतीने आयुष्याचा निकाल नको!

परवा अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने चाकूने गळा कापून आत्महत्या केली. त्यासंदर्भाने त्याने व्हॉट्सअॅप स्टेटस ठेवला होता. पोलिसांच्या तपासात उत्कर्ष महादेव शिंगणे हा विद्यार्थी शैक्षणिक दबावामुळे नैराश्यात होता. त्यातून आत्महत्या झाली असल्याचे म्हटले आहे, तर नागपूरला दहावीच्या परीक्षेत प्रथम नापास झाल्यानंतर पुन्हा परीक्षा दिली आणि आता पुन्हा नापास होण्याच्या भीतीने आर्यन लुटे या विद्यार्थ्याने आत्महत्या केली.

बारावीत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली. या सर्व घटना होत असतानाच, निकालाच्या भीतीने एका सातवीच्या वर्गातील विद्यार्थिनीने घरातून पलायन केल्याची घटना समोर आली. दहावी, बारावीच्या परीक्षेच्या निकालाच्या भीतीने विद्यार्थी आत्महत्या करत होते. काही विद्यार्थी घरातून पळून जात होते. या निर्णयामागे विद्यार्थ्यांची स्वविचाराची वाट नव्हती, तर मनात पालकांची भीती होती, मार्कांचा ताणतणाव होता.

हा भीतीचा स्तर अलीकडे दिवसेंदिवस खाली येतो आहे. भविष्यात निम्न प्राथमिक स्तरावर हा तणाव आला तर नवल वाटायला नको. ही वाट अशीच चालली गेली, तर उद्या ही संख्या अधिकाधिक वाढत जाण्याचा धोका आहे. परीक्षा आणि निकालाची भीती म्हणजे शिक्षणाचा प्रवास चुकीच्या दिशेने सुरू झाल्याचा पुरावा मानायला हवा.

मागील आठवड्यात महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरातील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी परीक्षेच्या निकालाच्या भीतीने घरातून पळून गेली. पळून जाताना तिने आपल्या लहान बहिणीलादेखील सोबत नेले होते. पोलिसाची कर्तव्यदक्षता आणि जागरुकतेमुळे मुलगी सापडली आणि पालकांच्या हाती मिळाली. चौकशीनंतर सातवीच्या निकालाच्या भीतीने घर सोडल्याचे तिने सांगितले.

ही घटना घडून चार-पाच दिवस होत नाही तोच खरगपूरच्या आयआयटीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचे वृत्त येऊन धडकले.

उत्कर्ष नामक विद्यार्थ्याने स्वत:चा गळा कापून आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण नोंदवताना अभ्यासाचा ताण आणि नैराश्यामुळे



आत्महत्या करत असल्याची चिठ्ठी मागे ठेवली. गेल्या काही वर्षांपासून कोटा येथील आत्महत्यांचे सत्र सातत्याने सुरू आहे. शिक्षणाचा हा परिणाम अत्यंत नकारात्मक आहे. शिक्षणामुळे हे घडत असेल, तर शिक्षणाच्या संदर्भाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. शिक्षणामुळे कोणत्याही बालकाचा मृत्यू हा शिक्षण व्यवस्थेसाठी वेदनादायीच म्हणायला हवा.

एकीकडे पाल्यांचा बळी जातो आहे. त्यांचे आयुष्य अंधाराच्या खाईत लोटले जात आहे. गेली काही वर्षे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सातत्याने वाढत आहेत. जीवन जगण्याची वाट समृद्ध करण्याच्या प्रवासात, वाट समृद्ध होण्याऐवजी अंधारमय बनते आहे. शिक्षणाने जीवन समृद्ध बनायला हवे. जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षणाने हिंमत देण्याची गरज आहे. मात्र तसे न घडता ही कोवळी पानगळ होत असेल, तर पालक आणि व्यवस्थेने याकडे गांभीर्याने पाहायला हवे.

उद्याचे भविष्य ज्या बालकांच्या हाती आहे ती पिढीच निराशाग्रस्त बनण्याची शक्यता आहे. खरेतर मुलांचे शिक्षण आनंदाने होऊ देणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. पालक म्हणून अपेक्षांचे ओझे सतत लादले जात आहे. आपले स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग म्हणून पाल्यांकडे पाहिले जात आहे. समाजात पालकांची प्रतिष्ठा पाल्यांच्या मार्कांच्या आलेखात दडलेली आहे. शिक्षण म्हणजे मार्क नाही हे लक्षात घेऊन मुलांना मुक्तपणे विकसित होऊ देण्याची गरज आहे. आज पालकांनी लादलेल्या विविध अपेक्षांच्या ओझ्याखाली मुले दबून जात आहेत. जीवन फुलण्यासाठीच्या मार्गांच्या प्रवासापेक्षा एकेरी प्रवास करण्यासाठी पालक आग्रह करताना दिसत आहेत. जीवन हेच शिक्षण असायला हवे. शिक्षण सुरू असतानाच जीवनाला सामोरे जाण्यासाठीची तयारी व्हायला हवी आहे.

पान १ वरुन...

### राज्यात पुनः एकदा...

स्थगितीनंतर १७ मे रोजी आयपीएलला पुन्हा सुरुवात केली. सनरायजर्स हैदराबाद संघाचा स्टार फलंदाज ट्रॅव्हिस हेडला कोव्हिड-१९ ची लागण झाली आहे. आयपीएल स्थगित झाल्यानंतर तो मायदेशी म्हणजेच ऑस्ट्रेलियाला परतला होता. तेव्हा हेडला करोनाची लागण झाली.

### मुंबई लोकलला आणखी...

एमयुटीपी-३ मध्ये पनवेल-कर्जत हा प्रकल्प, ऐरोली-कळवा हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. या टप्प्यात बोरीवली-विरार, गोरेगाव-बोरीवली हार्बर लाइन, कल्याण-बदलापूर, कल्याण-आसनगावदरम्यान विस्ताराची कामेही नियोजित आहेत. दरम्यान, मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (टप्पा-२) १०० कोटी, मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प (टप्पा-३) ८०० कोटी आणि मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प टप्पा ३/अ ८७७ कोटी अशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. या निधीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण एमयूटीपी प्रकल्पांना गती मिळणार असून महानगरातील कनेक्टिव्हीटी सुधारून प्रवाशांना अधिक सुविधा मिळणार आहे. आर्थिक पाठबळामुळं नवीन कॉरिडॉर, स्टेशन उन्नतीकरण आणि सुधारित रेल्वे पायाभूत सुविधा यांसह महत्त्वपूर्ण एमयुटीपी प्रकल्प वेगाने प्रगती करत आहेत.

### राज्यातील सर्व खाजगी...

education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Pre-School Registration टॅबवर करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अन्वये ३ ते ६ वयोगटातील मुलांना एकसंध आणि नियोजनबद्ध शिक्षण सुविधा देण्याच्या उद्देशाने ही कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी शाळा आणि केंद्रांनी आपली नोंदणी अनिवार्यपणे पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिला आहे.

**नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

१. शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची प्रमाणपत्रे
२. इमारत पूर्णत्वाचा दाखला
३. आरोग्य व स्वच्छता प्रमाणपत्र

### कोणीतरी माझा आवाज...

या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते. सुरुवातीला एकनाथ शिंदे यांच्यासमोर एक माईक होता. सुमारे १५ ते २० मिनीटे भाषण केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्यासमोरील तो माईक बदलण्यात आला. त्यानंतर पुन्हा १० मिनीटांनी दुसरा माईक बाजूला ठेवून तिसरा माईक एकनाथ शिंदे यांच्या हाती देण्यात आला. त्यानंतर माईक बदलणाऱ्याला एकनाथ शिंदे हसत म्हणाले, 'चौथा माईक आणणार आहात का?' त्यानंतर पुन्हा एकनाथ शिंदे म्हणाले. कोणीतरी माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, त्यामुळे सभागृहात एकच हशा पिकला. परंतु माझा आवाज जनतेचा आवाज आहे, तो कोणीही बंद करू शकणार नाही असे म्हणताच, उपस्थितांनी टाळ्यांचा वर्षाव केला.

### राज्य सरकारचा...

ठाण्याच्या परिमंडळातील २६ लाख ४० हजार ४७२ शिधापत्रिकांपैकी ५ लाख ३० हजार २४३ रेशन कार्डधारकांची केवायसी प्रलंबित असून, तब्बल १ लाख ३५ हजार ७०८ रेशन कार्ड रद्द करण्यात आलेले आहेत. त्यात मुंब्रा, कळव्यातील कार्डांचा अधिक समावेश आहे. तर ठाणे ग्रामीणमधील १६ हजार ३३९ रेशन कार्ड रद्द करण्यात आले असून, ६ लाख ६१ हजार २०७ पैकी १ लाख ६५ हजार ७४ रेशन कार्डची केवायसी करणारे बाकी आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.

ई-निविदा सूचना क्रमांक ५ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ योग्य **कंत्राटदारांकडून** खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **www.mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr No. | Name of Work | Estimated Cost in Rupees |
|---|---|---|
| 1. | विदर्भ विद्या मंदिर स्कुल जवळील बुवा साळवी मैदान (पु) कुरार व्हिलेज झोपडपट्टीच्या बाजूस मालाड पूर्व येथे दरड प्रतिबंधक उपाययोजना करणेबाबत. | रु. २४१९८८८३.००/- |

ई - निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक १४/०५/२०२५ @ १५.०० पासून दिनांक २१/०५/२०२५ @ १५.०० पर्यंत. |
| २. | प्री-बीड मिटींग | दिनांक १९/०५/२०२५ रोजी १५.०० वाजता अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |
| ३. | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक २२/०४/२०२५ @ १५.१५ वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ ८०८
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्र. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- ८/०५/२०२५

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२५-२०२६/६२६

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.** • Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com


# अन्यथा आमरण उपोषण, प्रभादेवी पूल प्रकल्पग्रस्तांचा राज्य सरकारला इशारा

**■ मुंबई : मेहुल गायकवाड**

**शिवडी-वरळी उन्नत रस्ता प्रकल्पाअंतर्गत प्रभादेवी पुलाच्या बांधकामात बाधित होणाऱ्या १९ इमारतींचा समूह पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहिर केला आहे. मात्र त्याबाबतचे कोणतेही लेखी आश्वासन देण्यात आलेले नाही किंवा शासन निर्णय अद्याप प्रसिद्ध झालेला नाही.**

२८ एप्रिल रोजी आठ दिवसात यासंबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध होईल, असेही राज्य सरकारकडून जाहिर करण्यात आले होते. मात्र १५ दिवस उलटून गेले तरी अद्याप लेखी आश्वासन मिळालेले नाही आणि शासन निर्णयही प्रसिद्ध झालेला नाही. त्यामुळे सरकार फसवणूक करत असल्याचा आरोप करून आता १९ इमारतीतील प्रकल्पबाधित आक्रमक झाले आहेत. येत्या आठवड्यात यासंबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला नाही वा लेखी आश्वासन मिळाले नाही तर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा प्रकल्प बाधितांनी दिला आहे.

अटल सेतूला जोडणाऱ्या शिवडी-वरळी उन्नत रस्त्याअंतर्गत सध्याचा प्रभादेवी पूल पाडून त्याजागी मुंबई महागनर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) नवीन द्विस्तरीय पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या कामात प्रभादेवी पुलालगतच्या दोन इमारती प्रत्यक्ष बाधित होणार आहेत. त्या १७ इमारतींना काहीसा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे १९ इमारतींचा समूह पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र त्याबाबतचे कोणतेही लेखी आश्वासन किंवा शासन निर्णय जाहिर झालेला नाही. दरम्यान एमएमआरडीएने २५ एप्रिलला प्रभादेवी पूल बंद करत



त्याचे पाडकाम करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी मुंबई वाहतूक पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्रही एमएमआरडीएला मिळाले होते. मात्र प्रकल्पबाधितांना योग्य पुनर्वसनाच्या आणि तिथल्या तिथेच पुनर्वसन करण्याची मागणी करून पूल बंद होऊ दिला नाही. प्रकल्पबाधितांनी रस्यावर उतरून एमएमआरडीए आणि सरकारविरोधात आंदोलन केले. परिणामी एमएमआरडीएला पूल बंद करता आला नाही. आजही पुलावरुन वाहतूक सुरु असून पुलाचे पाडकाम लांबणीवर केले आहे. या आंदोलनानंतर सरकारने १९ इमारतींचा तिथल्या तिथेच समुह पुनर्विकास करण्याची घोषणा केली. दोन इमारतीतील रहिवाशांना कुर्ल्याऐवजी प्रभादेवी किंवा आसपास संक्रमण शिबिराचे गाळे उपलब्ध करुन देता येतात का यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन एमएमआरडीएने दिले. महत्त्वाचे म्हणजे यासंबंधीचे लेखी आश्वासन किंवा शासन निर्णय आठ दिवसात प्रसिद्ध होईल असे आश्वानही दिले. त्या आश्वासनाला १५ दिवस उलटले तरी शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही. त्यामुळे प्रकल्प बाधित नाराज आहेत. आठ दिवसात शासन निर्णय प्रसिद्ध होईल असे आश्वासन आम्हाला एप्रिल अखेरीस देण्यात आले होते.

## कर्करोगमुक्त महिलेला २४ आठवड्यांची गर्भधारणा संपुष्टात आणण्यास परवानगी; उच्च न्यायालयाचा निर्णय

**■ मुंबई : गणेश बागडे**

स्तनाच्या कर्करोगातून मुक्त झालेल्या ४० वर्षांच्या महिलेला २४व्या आठवड्यांत गर्भपात करू देण्यास उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने नुकतीच परवानगी दिली. ही महिला वैद्यकीय गर्भपात करण्याच्या प्रक्रियेसाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम आहे, असा अहवाल तज्ज्ञांच्या समितीने दिला होता. त्या आधारे न्यायालयाने या महिलेला २४व्या आठवड्यांत गर्भपात करण्याची परवानगी दिली. याचिकाकर्ती स्तनाच्या कर्करोगातून मुक्त झाली आहे. असे असले तरी तिची वैद्यकीय स्थिती लक्षात घेता गर्भाधारणेच्या एवढ्या उशिराच्या टप्प्यात तिला गर्भपात करण्याची परवानगी देता येणे शक्य आहे की नाही? त्याचा तिच्या आरोग्यावर काही परिणाम होईल का? याच्या तपासणीसाठी न्यायमूर्ती कमल खाता आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने जेजे रुग्णालयाला तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, तज्ज्ञांच्या समितीने तिच्या वैद्यकीय स्थितीचा अहवाल न्यायालयात सादर केला होता. त्यात वैद्यकीय पार्श्वभूमीमुळे याचिकाकर्ती गर्भधारणा सुरू ठेवण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार नाही. याउलट, २४व्या आठवड्यात गर्भपात करण्यासाठी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे. त्यामुळे, तिला २४व्या आठवड्यांत गर्भपाताची परवानगी द्यावी, अशी शिफारस समितीने अहवालात केली होती. हा अहवाल



ग्राह्य धरून त्याआधारे सुट्टीकालीन खंडपीठाने याचिकाकर्तीला गर्भपातास परवानगी दिली. याचिककर्ती स्तनाच्या कर्करोगातून एप्रिल २०२१ मध्ये पूर्णपणे बरी झाली. तथापि, कर्करोगावरील उपचारामुळे तिच्या गर्भधारणेच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, असे तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी तिला सांगितले होते. दरम्यान, नियमित वैद्यकीय तपासणीच्या वेळी ती गर्भवती असल्याचे उघड झाले. गेल्या २५ एप्रिल रोजी तिची सोनोग्राफी करण्यात आली असता ती २३ आठवड्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले.

## पवई तलाव जलपर्णींच्या वेढ्यातून मुक्त करण्यासाठी विशेष मोहीम

**■ मुंबई : सम्यक कासारे**

पवई तलावात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या जलपर्णींमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय संकटावर मात करण्यासाठी आता स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणप्रेमी सरसावले आहेत. तलावाची स्वच्छता आणि जलपर्णीमुक्त करण्यासाठी त्यांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. दरम्यान, याप्रकरणी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंत्र्यांनाही ईमेलद्वारे तक्रार केली आहे. 'सेव्ह पवई लेक' या नावे सुरू करण्यात आलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत रहिवाशांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल पाठवले असून त्वरित हस्तक्षेप करून अधिकाऱ्यांना जलपर्णी हटवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी केली आहे. अनेकवेळा अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, अशी खंत जलवायू विहारच्या रहिवासी पामेला चीमा यांनी व्यक्त केली. तलावातील जलपर्णी तलावात सूर्यकिरण पोहोचवण्यास अडथळा निर्माण करते. त्यामुळे जैवविविधतेवर प्रतिकूल परिणाम होतो. अधिकाऱ्यांनी तलावात कोणतेही नाल्याच्या किंवा मलजलवाहिन्या सोडल्या आहेत का, याची तपासणी करावी असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या ईमेल मध्ये नमूद केले आहे. पवई तलाव हा मगरी, मासे, पक्षी आणि इतर अनेक जलचरांचे निवासस्थान आहे. तसेच सध्या तलावाची अवस्था



दयनीय झाली असून ही दृष्ये मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या कोणालाही स्पष्टपणे दिसतात, असेही कुमार यांनी निदर्शनास आणून दिले. या तलावाकडे कोणत्याही अधिकाऱ्यांचे किंवा निवडून आलेल्या नेत्यांचे लक्ष का गेले नाही? असा सवाल उपस्थित केला आहे. मुंबईत सुशोभीकरणाच्या अनेक घोषणा झाल्या पण त्या प्रत्यक्षात उतरत नसल्याची खंत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली. कार्यकर्ते शब्बीर तांबावाला यांनी तलावाच्या विदारक स्थितीची छायाचित्रे मुख्यमंत्र्यांना पाठवली. तसेच पालिका आयुक्तांनाही ती पाठवण्यात आली आहेत. दरम्यान पवई तलाव हा मुंबईतील एकमेव मोठा तलाव असून अनेक मुंबईकर व पर्यटकही तेथे पर्यटनासाठी हमखास भेट देत असतात. हा तलाव आता प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे. जलाशयात जलपर्णी, गाळ आणि सांडपाण्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावली आहे.

## रेल्वे सेवा सुरळीत ठेवण्यासाठी रेल्वे मार्गावर पाणी साचणाऱ्या ठिकाणी अतिरिक्त उपाययोजना

**■ मुंबई : नितीन देवळेकर**

पावसाळा तोंडावर आला असून मुसळधार पावसामुळे रेल्वेमार्गावर पाणी साचून लोकल सेवा विस्कळीत होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनाने युद्धपातळीवर कामे हाती घेतली आहेत. रेल्वे मार्गावर पाणी साचणाऱ्या ठिकाणांचा व्यापक अभ्यास करून मध्य रेल्वेने अतिरिक्त उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच ३१ मे २०२५ पर्यंत पूर्वपावसाळी कामे पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पावसाळ्यात रेल्वे सेवा विस्कळीत होऊ नये यादृष्टीने ही कामे करण्यात येत आहेत.

मध्य रेल्वेच्या नुकताच झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई विभागात सुरू असलेल्या पूर्वपावसाळी कामाचे मूल्यांकन केले. मध्य रेल्वेवरील पाणी



साचण्याची शक्यता असलेल्या ३३ संवेदनशील ठिकाणांचा शोध घेण्यात आला असून मुसळधार पावसातही रेल्वे सेवा सुरळीत राहावी यादृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या ठिकाणी पाणी उपसा करणारे एकूण ११२ पंप बसवण्याचे नियोजन आहे. त्यात १०० अश्वशक्तीच्या पंपांचा समावेश आहे. ११२ पंपापैकी ४४ पंप मुंबई महापालिकेतर्फे उपलब्ध करण्यात येणार असून उर्वरित ६८ पंप मध्य रेल्वे संवेदनशील ठिकाणी बसवणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. याव्यतिरिक्त, पालिका चार संवेदनशील पूरप्रवण विभागात प्रमुख पंपिंग केंद्र उभारत आहे आणि सखल भागात मुसळधार पावसात रेल्वे मार्गावर पाणी साचू नये म्हणून चार फ्लडगेट्स देखील बसवणार आहे.

नाले आणि नाल्याच्या स्वच्छतेचे काम वेगात सुरू आहे. ही कामे पूर्ण करण्याची ३१ मे २०२५ ही अंतिम मुदत असून यावेळेत कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. पावसाळ्यात लोकल सेवा विनाव्यतय सुरू राहण्यासाठी, साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी पंपाची मोठी मदत होणार आहे. पाणी साचत असण्याची शक्यता असलेल्या भागात अतिरिक्त उपाययोजना करण्यात येणार आहेत, असे मध्य रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले.

## कळंबोलीत सर्वाधिक लांबीच्या रेल्वे उड्डाणपुलाच्या गर्डरचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण

**■ नवी मुंबई : विशाल कारंडे**

भारतातील मालवाहतुकीच्या पायाभूत सुविधांना वेग आणि चालना देण्यासाठी, मालगाड्यांसाठी स्वतंत्र रेल्वे मार्ग तयार करण्यात येत आहे. मुंबई महानगरात या रेल्वेमार्गाचे काम वेगात सुरू आहे. नुकताच डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडने (डीएफसीसीआयएल) वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या (डब्ल्यूडीएफसी) जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण – निळजे विभागातील कळंबोली येथे ११०.५ मीटर लांबीचा आणि सुमारे १,५०० टन वजनाचा एक मोठा स्टील गर्डर यशस्वीरित्या उभारण्यात आला आहे. कळंबोली येथे सर्वाधिक लांबीच्या रेल्वे उड्डाणपुलाच्या गर्डरच्या उभारणीमुळे एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. भारतीय रेल्वे आधुनिकतेच्या दिशेने पाऊल टाकत असताना




दुसऱ्या बाजूला पर्यावरणपूरक वाहतुकीकडे अधिक लक्ष केंद्रित करत आहे. यासाठी देशभरात मालवाहतुकीसाठी समर्पित रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. यामध्ये पश्चिमेकडील 'वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर'ची उभारणी करण्यात येत आहे.

## २३ झोपु योजना मार्गी लागल्याने २८ हजार झोपडीधारकांचे पुनर्वसन!

**वित्तीय संस्थांनी अर्थसहाय्य केलेल्या सुमारे ४७ योजनांपैकी २३ योजनांमध्ये विकासक नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे २७ हजार ७९३ झोपडीधारकांचे पुनर्वसन मार्गी लागणार आहे. या सर्व २३ योजनांमध्ये नवे विकासक नियुक्त करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून या विकासकांकडून झोपडीधारकांना दोन वर्षांचे आगावू व त्या पुढील वर्षासाठी धनादेश मिळणार आहेत.**

**■ मुंबई : विशाल कारंडे**

मुंबईत तब्बल ३८० हून अधिक झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडल्या होत्या. या रखडलेल्या झोपु योजनांपैकी अनेक योजनांना विविध वित्तीय संस्थांनी अर्थसहाय केले होते. मात्र या योजना ठप्प झाल्यामुळे वित्तीय संस्थांचे मोठी गुंतवणूक अडकली होती. भाडे मिळत नसल्यामुळे झोपडीवासीय हैराण झाले होते. अशा झोपु योजना पुनरुज्जीवित करण्यात वित्तीय संस्थांनी रस दाखविल्यानंतर राज्य शासनाने मे २०२२ मध्ये अभय योजना जारी केली. यानुसार वित्तीय संस्थांची सह-विकासक म्हणून नोंद करण्यास शासनाने मान्यता दिली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अशा योजनांमध्ये वित्तीय संस्थांना विकासक नियुक्तीस मान्यता दिली. सुमारे १६ वित्तीय संस्थांनी ४७ योजनांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविले होते. त्यापैकी सात वित्तीय संस्थांच्या २३ योजनांना मान्यता दिल्यानंतर आता या योजना कार्यान्वित झाल्या आहेत. या योजनांमध्ये नियुक्त झालेल्या विकासकांना पाच टक्के अधिमूल्य माफ करण्यात आले असून नियुक्तीसाठी झोपडीवासीयांच्या संमतीची अटही शिथिल करण्यात आली आहे. आयआयएफएल फायनान्स लि.च्या नऊ योजना सुरू झाल्या असून यापैकी सहा योजना आयआयएफएल स्वतः राबविणार आहे तर उर्वरित दोन योजना भृगू रिअल्टी आणि मे. ३६० वन ॲसेट मॅनेजमेंट आणि भारद्वाज बिल्डकॉनमार्फत मार्गी लागणार आहे. पिरामल कॅपिटल ॲंड हौसिंग फायनान्सच्या पाच योजना असून या सर्व योजनांमध्ये मे. शिव इन्फ्रा व्हिजन प्रॉपर्टीज, अल्पर्टान डेव्हलपर्स, मे. संधी रिअल्टर्स व जीवनाम डेव्हलपर्स हे खासगी विकासक आहेत. जेसी फ्लॉवर्स ॲसेट रिकन्स्ट्रक्शनच्या दोन योजना अनुक्रमे मे. ओबेरॉय रिअल्टी आणि मे. कश्यप बिल्डकॉन पूर्ण करणार आहेत. एडेलव्हाईज एआरसीच्या दोन योजना मे. महादेव स्पेस इनोव्हेटर आणि अनंतया बिल्डकॉन तर एसीआरईच्या दोन योजना प्रयोक्ट्री डिल आणि मे. एम ८६ रेसिडेन्सी प्रा. लिमार्फत तर संघवी फायनान्सची योजना मे. दोस्ती ग्रुप आणि थार कमर्शिअल फायनान्सची योजना मे. वीणा डेव्हलपर्स राबविणार आहेत. यामुळे २८ हजार झोपडीधारकांचे पुनर्वसन शक्य होणार असून शासनाकडे प्रलंबित असलेल्या अन्य २४ झोपु योजनाही तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे प्राधिकरणातील एका अधिकाऱ्याने सांगितले.



## कचरागाड्यांची सेवा कंत्राटदारांकडूनच; कामगारांच्या विरोधानंतरही मुंबई महापालिकेचा निर्णय

**■ मुंबई : प्रथमेश चाव्हाण**

संपूर्ण मुंबईतील कचरा संकलन करून वाहून नेण्याकरिता कंत्राटदारांकडून वाहने आणि सेवा घेण्याच्या निर्णयावर मुंबई महापालिका प्रशासन ठाम असून या कामासाठी मुंबई महापालिकेने निविदा मागवल्या आहेत. सात वर्षांसाठी ही सेवा घेतली जाणार असून त्यासाठी ४,१६५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मात्र कामगार संघटनांकडून या कंत्राटाला विरोध होण्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिकेने कचऱ्याच्या गाड्यांसदर्भात नवीन कंत्राट देण्याचे ठरवले आहे. घरोघरी गोळा केलेला कचरा गोळा करण्यासाठी सेवाधारित कंत्राट देण्याचे मुंबई महापालिकेच्या घनकचरा विभागाने ठरवले आहे. आतापर्यंत कचरा गोळा करण्यासाठी काही ठिकाणी महापालिकेची वाहने व महापालिकेचे कामगार होते, तर काही ठिकाणी कंत्राटदाराची वाहने आणि महापालिकेचे मोटर लोडर अशी पद्धत होती. ही पद्धत मोडीत काढून मुंबईतील २५ विभागांपैकी २२ विभागांमध्ये कंत्राटदाराची वाहने आणि त्यांचेच मनुष्यबळ असे सेवा आधारित कंत्राट देण्यात येणार आहे. या योजनेची कुणकूण लागताच कामगार संघटनांनी पालिकेच्या या कृतीला विरोध केला होता. मात्र कामगार संघटनांच्या




विरोधाला न जुमानता मुंबई महापालिकेने या कामासाठी निविदा मागवल्या आहेत.

कंत्राटदारांच्या सोयीमुळे कचरागाड्यांवर कचरा उचलून टाकणाऱ्या मोटर लोडरला काम उरणार नाही. त्यामुळे त्यांना रस्त्यावरील कचरा झाडण्याचे काम दिले जाणार आहे. त्यालाही कामगार संघटनांनी विरोध केला. कचरा संकलन व परिवहन हे अत्यंत महत्त्वाचे काम जर कंत्राटदारांकडून करून घेण्यात आले तर पालिकेला सर्वस्वी कंत्राटदारावर अवलंबून राहावे लागेल, अशी भूमिका बेस्ट कामगार सेनेने घेतली, तर दि म्युनिसिपल युनियननेही या कंत्राटाला विरोध केला. अशी सेवा घेण्याअगोदर प्रशासनाने कामगारांना विश्वासात घ्यायला हवे होते.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०२५ ते २१.५.२०२५ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक २२.५.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमुना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मादाम कामा रोड मुंबई येथील ४ मजल्यावरील इकोनॉमिक व स्टॅटेस्टिक विभाग येथील फ्लोरींग, पार्टीशन, टेबल, कारपेट दुरुस्ती करणे. | ६,६९,६८१/- | ६,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील एन. सी. सी. इमारत येथे ड्रेनेज लाईनची सफाई करणे. | ५,५१,५६८/- | ५,६००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | एन.सी.सी. बिल्डिंग मुंबई मधील फ्लोअरिंग, स्लाईडिंग विंडो आणि विविध कामांची दुरुस्ती करणे. | ८,४१,९६१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | विस्तारीत आमदार निवास मुंबई येथील फर्निचर व इतर मिसलिनियस आयटम्सचे काम करणे. | ८,३०,०४५/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | नविन विधानभवन मुंबई येथील कॉसिल व सेंट्रल हॉल मध्ये येथे पॉलिशिंग करणे. | ८,४२,३७१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकिय इमारत १, ४, ८, १२ मजल्यावरील फॉल्स सिलिंग, पॉलिश, रंगकामचे काम करणे. | ८,३०,७०२/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | महाराष्ट्र राज्याकरीता इचगाम, जिल्हा-बडगाम, जम्मु आणि काश्मिर येथे महाराष्ट्र भवन बांधकाम करणे व जागेची काळजी सुरक्षा इ. कामे करणे. | ३,६६,८५८/- | ३,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | इंस्टीट्युट ऑफ सायन्स इमारत मुंबई येथील कॅंटीन मधील फ्लोरींग व इतर काम करणे. | ८,४०,८५२/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | नविन विधानभवन मुंबई येथील १ मजल्यावरील मा. चेअरमन ऑफिस स्टाफ रुम येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ८,४२,७६४/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | उच्च न्यायालय मुंबई येथील मुख्य इमारत येथील विविध कोर्ट रुम, कार्यालय, पॅसेज पॉलिश व रंगकाम करणे. | ८,४१,३४५/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | नविन विधानभवन मुंबई येथील कंपाऊंड वॉल, ग्रील, गेट, शटर रंगकाम करणे. | ३,९३,७७२/- | ४,०००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स आवारातील डिन बंगला येथील आवारभिंत, खडबडीत शहाबाद फ्लोरिंग, पाण्याच्या टाकीचे प्लॅटफॉर्म, फिटींग, पॉलिश, रंगकाम, व दुरुस्ती करणे. (भाग-१ ते ३) | ७,२४,६१७/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | नविन सिटी सिव्हील कोर्ट इमारत मुंबई येथील स्लाईडिंग विंडो व इतर दुरुस्तीचे काम करणे. | ८,४३,०२९/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ५२९०
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ७/५/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/६२८

# ठाणे खाडी पूल-३ प्रकल्प : एकूण नुकसानीचे, प्रकल्पबाधित मच्छिमारांच्या देय भरपाईचे मूल्यांकन करा; अभ्यासासाठी उच्च न्यायालयाचे टीसची नियुक्ती

■ ठाणे : तृप्ती गोरे

ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पामुळे झालेल्या नुकसानाचा अभ्यास करण्यासाठी, तसेच प्रकल्पग्रस्त मच्छीमार समुदायाला देण्यात येणाऱ्या भरपाईचे प्रमाण निश्चित करण्यासाठी उच्च न्यायालयाने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेची (टीस) नियुक्ती केली आहे. तसेच, २१ नोव्हेंबरपर्यंत त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. मुंबई सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मच्छिमारांसाठी भरपाई धोरण आणि योजनेबाबत टीसने २०२३ मध्ये तयार केलेल्या अहवालाची न्यायमूर्ती बर्गिस कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना दखल घेतली. किनारा मार्गाचे काम सुरू असताना टीसने हा अभ्यास करून अहवाल सादर केला होता. या अहवालात प्रकल्पग्रस्तांना योग्य आणि व्यापक भरपाई प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे, ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पबाधिताच्या नुकसान भरपाईच्या अचूक मूल्यांकरनासाठी टीसची नियुक्ती करण्यात येत असल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले. पुलामुळे झालेले नुकसान अत्यंत अचूकपणे निश्चित करता येत नाही हे स्पष्ट असले तरी, सर्व संबंधित घटकांचा विचार करून नुकसान आणि तोटा निश्चित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे देखील न्यायालयाने आदेशात नमूद केले. शीव- पनवेल महामार्गावरील सहा पदरी ठाणे खाडी पूल-३ हा बहुतांश पूर्ण झाला आहे. तसेच, त्याचा काही भाग आधीच वाहनांसाठी खुला



झाला आहे व काही आठवड्यात हा पूल पूर्णपणे कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे (एमएसआरडीसी) अखत्यारित येणाऱ्या पुलाच्या प्रस्तावित बांधकामामुळे ठाणे खाडी आणि तिच्या आसपासच्या परिसरातील मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न उपस्थित करून मरियायी मच्छीमार सहकारी संस्थेने २०२१ मध्ये उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, प्रकल्पग्रस्तांना योग्य भरपाईची मागणी केली होती. ऑगस्ट २०२१ मध्ये, उच्च न्यायालयाने पुलाच्या बांधकामाचा मार्ग मोकळा केला होता. त्याचवेळी, प्रकल्पग्रस्त मच्छीमारांच्या मासेमारीच्या पारंपरिक व्यावसायावर परिणाम होईल, असे न्यायालयाने म्हटले. तसेच, प्रकल्पग्रस्त मच्छीमारांना देय रक्कम निश्चित करण्यासाठी केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेंतर्गत ठाणे खाडी पूल भरपाई समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. मार्च २०२२ मध्ये, उच्च न्यायालयाने वाशीजवळील तिसऱ्या ठाणे खाडी पुलाच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या ९०० हून अधिक मच्छीमार कुटुंबांना १० कोटी रुपयांची अंतरिम भरपाई देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, प्रत्येक कुटुंबाला एक लाख रुपये देण्यात आले. तथापि, प्रत्येक बाधित कुटुंबाला द्यावयाच्या अंतिम भरपाई रकमेचा प्रश्न प्रलंबित होता. भरपाईबाबतचा अंतिम अहवाल २०२३ मध्ये न्यायालयात सादर करण्यात आला. त्यात पुलामुळे परिसरातील मासेमारीवर परिणाम झाला आहे.

# मिरा भाईंदर महापालिकेच्या मालमत्तांचे 'डिजिटलायझेशन'

■ भाईंदर: सचिन कदम

मिरा भाईंदर महापालिकेच्या मालमत्ता प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली घेण्यासाठी त्यांचे डिजिटलायझेशन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यामुळे कामकाजात पारदर्शकता वाढणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.महापालिकेच्या कामकाजात डिजिटल पद्धतीचा अधिकाधिक वापर करण्यावर प्रशासनाचा भर आहे. मागील दोन वर्षात 'ई-ऑफिस'सारखे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात महापालिकेला यश आले आहे. आता त्याचाच पुढचा टप्पा म्हणून, महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्या डिजिटल यंत्रणेखाली आणण्याचा निर्णय आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी



घेतला आहे. महापालिकेच्या मालकीच्या अनेक वास्तू असून त्यापैकी काही भाडे तत्वावर देण्यात आल्या आहेत, ज्यातून प्रशासनाला उत्पन्न मिळते. तर काही वास्तूंच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. याशिवाय मालमत्ता विभागाच्या ताब्यात असलेल्या व प्रस्तावित वास्तूंचीही मोठी यादी आहे. सध्या या वास्तूंचे कामकाज मिळकत तसेच अन्य विभागांमार्फत चालवले जाते. यामुळे संबंधित माहिती मिळवण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते आणि कामाच्या पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण होतो.हा प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेच्या सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांचे डिजिटलायझेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# प्रिटिंग मिस्टेक न करता दिलेला शब्द पाळणारे आमचे सरकार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ डोंबिवली : सतिश सोनावणे

लाडकी बहिण योजनेविषयी विरोधक विविध प्रकारच्या दररोज अफवा पसरवत आहेत. समाजात संभ्रम निर्माण करत आहे. पण, लाडक्या बहिणींनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये. लाडकी बहिण योजना ही कधीही बंद होणार नाही. ती सुरूच राहणार आहे. कारण आमचे सरकार प्रिटिंग मिस्टेक न करणारे आणि दिलेला शब्द पाळणारे डबल इंजिन सरकार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी डोंबिवलीत विविध विकास कामांचे उद्घाटन करताना केले.

सावळाराम महाराज क्रीडासंकुलात आयोजित या कार्यक्रमात कचरा वाहतूक संकलन स्वच्छता प्रकल्प, टिटवाळा उद्यान विकास प्रकल्प, कौशल्य विकास केंद्र, खंबाळपाडा क्रीडा संकुलाचे भूमिपूजन, पोलिसांच्या दामिनी पथकाला १६ दुचाकींचे हस्तांतरण, लोकार्पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी विशेष प्रयत्न




बाधित लाभार्थींना चावी वाटप, परिवहन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्त योजनेचे धनादेश, आरटीओ नवीन इमारतीचे उद्घाटन अशा नऊ प्रकल्पांचे केले होते. या कार्यक्रमाला भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार राजेश मोरे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार विश्वनाथ भोईर, आयुक्त अभिनव गोयल, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, कचरा व्यवस्थापक प्रकल्प राबविणाऱ्या सुमित एल्को कंपनीचे संचालक मंडळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते. विकासाला चालना देण्याचे काम राज्यस्तरावरून सुरू आहे. तरीही विरोधक लाडकी बहिण योजनेविषयी अनेक अफवा पसरवत आहेत. त्यावर कोणीही विश्वास ठेऊ नये. आमच्या सरकार मधील काम करणारी मंडळी एकाच विचाराची आहेत. या सरकारला डबल इंजिन आहे. पंतप्रधान मोदींची या सरकारला साथ आहे. आम्ही प्रिटिंग मिस्टेक न करता काम करतो. आम्ही दिलेला शब्द पाळतो. ॥ दिला.

# वसई रेल्वे स्थानकात फलाट आणि लोकलमधील अंतर धोकादायक; अपघाताचा धोका

■ वसई : सुचिता देशमुख

वसई रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ४ आणि लोकल मधील अंतर प्रवाशांसाठी धोकादायक ठरू लागले आहे. या अंतरामुळे घाई घाईत चढ उतार करताना प्रवासी त्यात अडकून अपघाता होण्याची भीती प्रवाशांनी व्यक्त केली असून त्यावर रेल्वे प्रशासनाने



योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी पुढे आली आहे. पश्चिम रेल्वे वरील गजबजलेल्या रेल्वे स्थानकांपैकी एक स्थानक म्हणजे वसई रेल्वे स्थानक. रोज लाखो प्रवासी वसई ते विरार आणि चर्चगेट ते वसई असा प्रवास करतात. चर्चगेटहून विरारला जाणारी लोकल वसई स्थानकात फलाट क्रमांक २ किंवा मग फलाट क्रमांक ४ वर येऊन थांबते. पण, फलाट क्रमांक ४ आणि लोकलमधील अंतरामुळे इथे उतरणाऱ्या प्रवाशांना लोकलमधून उतरताना बरीच खबरदारी घ्यावी लागते. गर्दीच्यावेळी लोकलमध्ये चढण्याची गडबड सुरू असताना प्रवाशाचा पाय फलाट आणि लोकलच्या फटीत अडकून अपघात होण्याची शक्यता यामुळे संभवते. तसेच लांब पल्ल्याच्या गाड्या या फलाटावर थांबत असल्यामुळे इथे प्रवाशांची गर्दी असते. तसेच, अनेकदा स्वयंचलित जिन्यांनी पुलावर जाण्याकरता प्रवासी संपूर्ण फलाट ओलांडतात. यादरम्यान किंचित धक्काबुक्की झाल्यास ती गंभीर अपघाताचे कारण ठरू शकते.

वसई स्थानकात गर्दीच्यावेळी फलाट क्रमांक ४ वर उतरताना अचानक खोल खड्ड्यात पडल्यासारखा भास होतो असं दहिसर ते वसई प्रवास करणारे प्रवासी विनोद मिश्रा यांनी सांगितले आहे.



# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कनेक्टिव्हिटीला चालना; येत्या जूनमध्ये पश्चिम प्रवेश आंतरबदल प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पश्चिम भागाकडील मार्गिका जोडणीसाठी (कनेक्टिव्हीटी) सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील संयुक्त प्रकल्प असणाऱ्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम येत्या जूनपर्यंत पूर्ण होणार आहे. आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्गावरून विमानतळाकडे येणारी-जाणारी वाहतूक या प्रकल्पामुळे सुलभ होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पुर्ण होण्याच्या मार्गावर असून विमानतळाला उत्तम मार्गिका जोडणी असावी, याकरिता त्या परिसरातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळासोबत जोडण्याकरिता जोडणीमार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर (पोर्ट) कनेक्टिव्हिटी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणांतर्गत आम्र मार्ग, राज्य महामार्ग-५४ आणि राष्ट्रीय महामार्ग-४ बी यांच्या विस्तारिकरणाकरिता 'मुंबई-जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लिमिटेड' या विशेष उद्देश वाहन कंपनीची स्थापन करण्यात आली आहे.

या कंपनीच्या माध्यमातून निधी संकलन आणि अंमलबजावणी केली जाणार आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जेएनपीटी आणि सिडको यांची अनुक्रमे ६७.०४%, २६.९१% आणि ६.०५% इतका हिस्सा आहे. सिडकोकडून या प्रकल्पासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांची जमीन देण्यात आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता या महामार्गाचे विस्तारीकरण ही महत्त्वपूर्ण मार्गिका जोडणी (कनेक्टिव्हीटी) असणार आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदल हा अर्ध क्लोव्हरलिफ रचना असलेला असून, उलवे किनारी मार्गावरील १.२ किलोमीटर उन्नत विमानतळ लिंक रस्त्याशी जोडण्यात आला आहे. या मार्गावर दोन लूप आणि दोन रॅम्प असणार आहेत. दक्षिणेकडे जाण्यासाठी लूप – ए आणि उत्तर दिशेसाठी रॅम्प ए, तर विमानतळावरून बाहेर जाण्यासाठी लूप बी आणि रॅम्प बी वापरले जातील. तसेच, एक अतिरिक्त वाहन निम्नमार्ग आणि उलवे नदीवरील छोटा पूलही उभारण्यात येणार आहे.

याशिवाय, विमानतळाच्या पूर्व बाजूसही एनएच-४बी (NH-4B), एनएच-५४८ (NH-548) सोबत जोडण्यासाठी पुर्ण क्लोव्हरलिफ प्रकारातील पूर्व प्रवेश आंतरबदल मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. अटल सेतू ते विमानतळ यामधील जोडणीसाठी उलवे किनारी मार्ग विकसित केला जात आहे. जून २०२५ च्या पहिल्या आठवड्यात पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग पूर्णतः कार्यान्वित होऊन वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# खारघरमधील खाणी प्रदुषणाला कारणीभूत; प्रकरणाची चौकशी करणार...

■ खारघर : आकाश कांबळे

टाटा कॅन्सर रुग्णालया मागील खारघर – तुर्भे बोगद्याच्या मार्गातील टेकड्यांवरील खाणींमधून परिसरात होणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत पर्यावरणप्रेमींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. दरम्यान, याप्रकरणी मुख्यमंत्र्यानी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. खारघर – तुर्भे बोगद्याच्या मार्गातील टेकड्यांवरील खाणींमधून परिसरात धुळीचे लोट पसरत असून त्यामुळे प्रदुषणाचा धोका वाढल्याची तक्रार गुरुवारी पर्यावरणासाठी काम करणाऱ्या नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि खारघर हिल अँड वेटलँड या संस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेल पाठवून केली होती. यापूर्वी टाटा रुग्णालयाच्या संचालकांनी यासंदर्भात सरकारकडे तक्रार केली होती, त्यानंतर काही काळ खाणी बंद झाल्या होत्या. मात्र, काही दिवसांनंतर त्या पुन्हा सुरू करण्यात आल्या. दरम्यान, या खाणींमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट पसरत आहेत. या धुळीचा त्रास प्रामुख्याने टाटा कॅन्सर रुग्णालयातील रुग्ण आणि सेक्टर ३० ते ३५ आणि त्यापलीकडे असलेल्या निवासी



वसाहतींमधील रहिवाशांना होत असल्याचे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. याचबरोबर रुग्णालयातील प्रगत कर्करोग उपचार उपकरणांसाठी धूळ घातक असून, रुग्णांसाठी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचेही त्यांनी अधोरेखीत केले. दरम्यान, खाणीसाठी पर्यावरणीय मंजुरी आवश्यक असल्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले आहेत.

# बदलापूर एसआयटीच्या प्रमुख आरती सिंह बनल्या गुप्तवार्ता विभागाच्या पोलीस सहआयुक्त

■ बदलापूर : संजय बोडके

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) तत्कालीन प्रमुख आरती सिंह यांची पोलीस सह आयुक्त (गुप्तवार्ता) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादी संघटनाच्या हालचाली आणि 'स्लीपर सेल्स'वर लक्ष ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मुंबईसाठी सहाव्या सह पोलीस आयुक्त पदाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचे आदेश शुक्रवारी जारी करण्यात आले. पूर्वी मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेचे प्रमुखपद अतिरिक्त पोलीस आयुक्तपदाच्या अधिकाऱ्याकडे होते. ते पद आता उन्नत करून सह पोलीस आयुक्त दर्जाचे करण्यात आले आहे. तसेच व्हीआयपी सुरक्षा व संरक्षणाची जबाबदारीही याच अधिकाऱ्याकडे असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. बदलापूर येथे दोन शाळकरी मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास करण्यासाठी



एसआयटी स्थापन करण्यात आली होती. आरती सिंह त्या एसआयटीच्या प्रमुख होत्या. एसआयटीने याप्रकरणाचा तपास करून आरोपी अक्षय शिंदेविरोधात कल्याण येथील विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. आरती सिंह यांना आता मुंबईत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सह पोलीस आयुक्त (गुप्तवार्ता) या पदावर नियुक्त करण्यात आले आहे. त्या पदस्थापनेच्या प्रतीक्षेत होत्या. त्या आता मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेच्या प्रमुख असतील. सह पोलीस आयुक्त अधिकारी हा महानिरीक्षक (आयजी) दर्जाचा असतो. पूर्वी मुंबई पोलिसांची विशेष शाखा सह पोलीस आयुक्त कायदा व सुव्यवस्था यांच्या अंतर्गत होती. या अधिकाऱ्याअंतर्गत मुंबईतील सर्व पोलीस ठाणी आहेत. या नवीन पदामुळे सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांच्या जबाबदारीत घट झाली आहे. मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. मुंबई पोलिसांची सर्व गुप्तचर यंत्रणा याच विभागाअंतर्गत चालते. सध्या विशेष शाखेचा अतिरिक्त आयुक्त कायदा व सुव्यवस्था विभागाच्या सह पोलीस आयुक्तांना अहवाल देतो.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई - ४०० ०१८.
Email :- centralmumbai.ee@mahapwd.com
जा.क्र.का.अ./मम्मुंवि/ई-निविदा/ २०६७
दूरध्वनी ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२
दिनांक :- ०८/०५/२०२५

ई निविदा सूचना क्रमांक.०६ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून "बी-1" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविल आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.३ मधील शौचालयाचे नतनीकरण करणे. | 12.34 |
| २ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.६ मधील शौचालयाचे नतनीकरण करणे. | 12.19 |
| ३ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.२१ मधील स्त्री शौचालयाचे नतनीकरण करणे. | 12.34 |
| ४ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.२४ मधील पुरुष शौचालयाचे नतनीकरण करणे. | 12.29 |
| ५ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.६४ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.39 |
| ६ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.७० मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| ७ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.७१ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| ८ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.४६ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| ९ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.८३ मधील स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.33 |
| १० | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.८४ मधील स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.35 |
| ११ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.८६ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.34 |
| १२ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.८७ मधील स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| १३ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत वरळी येथील बीडीडी चाळ क्र.११३ आणि ११४ तळ मजल्यावरील पुरुष व स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| १४ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ क्र.२१ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.34 |
| १५ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ क्र.२० मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| १६ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत शिवडी येथील बीडीडी चाळ क्र.९ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.30 |
| १७ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत शिवडी येथील बीडीडी चाळ क्र.११ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.32 |
| १८ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत शिवडी येथील बीडीडी चाळ क्र.१२ मधील स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.29 |
| १९ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत नायगाव येथील बीडीडी चाळ क्र.ए-१३ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.33 |
| २० | विविक्षित दुरुस्तीतंर्गत नायगाव येथील बीडीडी चाळ क्र.ए-१४ मधील पुरुष शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.30 |
| २१ | विविक्षित दुरुस्तीतंर्गत नायगाव येथील बीडीडी चाळ क्र.ए-१५ मधील स्त्री शौचालयाचे नूतनीकरण करणे. | 12.21 |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दि.१५/०५/२०२५, सकाळी १५.०० पासून ते दि.२२/०५/२०२५ रोजी १५.०० पर्यंत | |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दि.२३/०५/२०२५ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग,कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८) | |

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१ http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक

डीजीआयपीआर/ २०२५-२०२६/६५७

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# आर्थिक गणिते सुरळीत करण्यासाठी पक्षप्रवेशांच्या घडामोडी घडल्या;जितेंद्र आव्हाड यांची पक्ष सोडून गेलेल्या नगरसेवकांवर टिका



■ **ठाणे : संजय बोडके**

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना (शिंदे) पक्षात सामील झालेल्या कळव्यातील माजी नगरसेवकांवर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कार्यकर्ता मेळाव्यात टिका केली आहे. विकास पुरुषाकडून महाविकास पुरुषाकडे जातो असे काही प्रकार नसून केवळ आर्थिक गणिते सुळीत करण्यासाठी पक्ष प्रवेशाच्या घडामोडी झाल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. तसेच माझ्या बाजूला बसून माझ्या मागे बॉम्ब लावत होते, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. आमदार जितेंद्र आव्हाड यांचे एकेकाळचे निकटवर्तीय समजले जाणारे ठाणे महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका मनिषा साळवी, माजी नगरसेविका आणि ठाणे महिला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे, माजी विरोधी पक्ष नेत्या प्रमिला केणी आणि युवा नेते मंदार केणी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केला. या घडामोडीनंतर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे पदाधिकारी प्रकाश पाटील यांनी गुरूवारी कळव्यात कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थिती लावून पक्ष सोडून गेलेल्या नगरसेवकांवर टिका केली. आधी भाजपमध्ये जाणार असे ठरले असताना अचानक शिवसेनेत कसे गेले हा मोठा प्रश्न आहे. विकास पुरुषाकडून महाविकास पुरुषाकडे जातो असा काही प्रकार नसून केवळ आर्थिक गणिते सुरळीत करण्यासाठी झालेल्या या घडामोडी आहेत, असा दावा आव्हाड यांनी केला. मी चिंता करणारा माणूस आहे. पण, पक्ष प्रवेश घडामोडीची मला चिंता वाटली नाही. कारण, गेल्या एक वर्षापासून मला छळत होते. माझ्या बाजूला बसून माझ्या मागे बॉम्ब लावत होते. या आजारपणाची मला सवय झाली होती. फक्त अंगावरचा फोड फुटला. फोड होता तेव्हा दुखायचे पण, आता गेला तेव्हा काही वाटत नाही. अजिबात दुख नाही, यातना नाही, आता बर वाटत आहे, असे ते म्हणाले. लोकांमध्ये प्रचंड राग आहे, लोक हाच प्रश्न विचारतात की आव्हाडांनी काय कमी केले होते.


## ठाकरेंचे निम्मे नगरसेवक शिंदे गटात, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अस्वस्थता वाढली

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

शिवसेना पक्षाची दोन शकले झाल्यापासून एकेक करीत सुमारे पन्नास टक्के माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. महापालिकेची निवडणूक लवकरच होण्याची शक्यता असल्यामुळे माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थता वाढत चालली आहे. दुसरीकडे ठाकरेंनी उरलेल्या माजी नगरसेवकांची एकही बैठक गेल्या वर्षभरात बोलवली नसल्यामुळे ते देखील नाराज आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका चार महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकांची तयारीही प्रशासकीय पातळीवर सुरू झाली आहे. त्यामुळे या निवडणुकीला उभे राहण्यास इच्छुक असलेल्या माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थता वाढू लागली आहे. त्यातही गेली पंचवीस-तीस वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता गाजवलेल्या शिवसेनेत आता दोन गट पडल्यामुळे ही निवडणूक शिवसेनेच्या दोन्ही गटांसाठी महत्त्वाची आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षातून गेल्या दोन अडीच वर्षात सातत्याने नगरसेवक बाहेर पडत असून त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. २०१७ ते २०२२ या अलिकडच्या काळातील पन्नास टक्के नगरसेवक ठाकरेंच्या पक्षातून बाहेर पडले आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर ज्या भागात महाविकास आघाडीचे आमदार खासदार निवडून येऊ शकले नाहीत.



त्या भागातील माजी नगरसेवकांना विकासनिधीच मिळत नसल्यामुळे तेथील माजी नगरसेवक अस्वस्थ आहेत. नगरसेवकांशी संवाद साधण्यासाठी ठाकरेंकडून एकही बैठक घेतली जात नाही. तर दुसरीकडे शिंदे यांच्या पक्षाकडून मात्र पक्ष प्रवेशासाठी चुचकारले जात आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीत निवडून येण्याची खात्री नसल्यामुळे ठाकरेंचे एकेक माजी नगरसेवक शिंदे यांच्या पक्षाच्या गळाला लागत आहेत.


शिस्तबद्ध पक्ष म्हणून शिवसेनेची ख्याती असून या पक्षाच्या वेळोवेळी बैठका होतात. मात्र गेल्या जुलै महिन्यापासून ठाकरेंच्या पक्षाने माजी नगरसेवकांची एकही बैठक घेतलेली नाही. तसेच कोणत्याही माजी नगरसेवकांना बोलावलेले नाही. नगरसेवक बैठकीला येतात आणि दुसऱ्या दिवशी पक्षातून बाहेर पडतात. त्यामुळे त्यांना बैठकीला बोलवू नका, अशी तक्रार एका विभागप्रमुखाने केल्यामुळे नगरसेवकांना बैठकीला बोलवले जात नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांच्या बैठका होतात पण माजी नगरसेवकांना बोलावले जात नसल्याबद्दल माजी नगरसेवक खंत व्यक्त करत आहेत. आता पालिका निवडणुकीच्या तोंडावर तरी माजी नगरसेवकांची बैठक घेणार का? असाही प्रश्न माजी नगरसेवकांनी उपस्थित केला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणूकीत एकसंघ शिवसेनेचे ८४ नगरसेवक निवडून आले होते. चार अपक्षांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे ही संख्या ८८ झाली. मनसेच्या सहा नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ही संख्या ९४ झाली होती. त्यात जात पडताळणीमध्ये तसेच पोटनिवडणूकीमुळे शिवसेनेचे आणखी पाच नगरसेवक वाढले.

## चित्रपट, मालिकांचे चित्रीकरण... स्टुडिओ उभारण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत नवीन अट

■ **मुंबई : विशाल कारंडे**

चित्रपट, मालिका, जाहिरातींच्या चित्रीकरणासाठी तात्पुरते स्टुडिओ उभारण्याच्या नियमावलीत सुधारणा करण्याचा निर्णय मुंबई महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या नव्या सुधारणेनुसार ना विकासक्षेत्र आणि सागरी नियमन क्षेत्रात (सीआरझेड) तात्पुरता स्टुडिओ किंवा सेट उभारण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी आवश्यक आहे. विकास नियंत्रण नियमावलीत त्यादृष्टीने बदल करण्यात आले असून यावर मुंबई महापालिका प्रशासनाने हरकती व सूचना मागवल्या आहेत.

मुंबईतील अनेक खासगी भूखंडावर चित्रपट, मालिका, जाहिरातींच्या चित्रकरणासाठी तात्पुरत्या स्वरुपात बांधकाम करण्यासाठी आतापर्यंत मार्च २०१९ च्या जुन्या परिपत्रकानुसार परवानगी देण्यात येत होती. मात्र या परिपत्रकानुसार ना विकास क्षेत्रात (एनडीझोन) किंवा सागरी नियमन क्षेत्रातही (सीआरझेड) तात्पुरते स्टुडिओ उभारण्यास परवानगी दिली जात



होती. त्यामुळे एमसीझेडएमए आणि सीआरझेड नियमांचे उल्लंघन झाल्याचेही उघडकीस आले होते. तसेच या ठिकाणी अनेकांनी पक्के बांधकाम करून स्टुडिओ उभारल्याची प्रकरणेही उघडकीस आली होती. त्यावरून मोठा राजकीय वादही झाला होता. त्यामुळे अशा अनियमित बांधकामांवर नियंत्रण आणण्यासाठी मुंबई महापालिकेने स्टुडिओंना परवानगी देण्याच्या परिपत्रकाचा आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन केली होती.

विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्ये तात्पुरते स्टुडिओ व सेट उभारण्यासाठी व्याख्या नसल्यामुळे अशा कामांना परवानगी देता येत नव्हती. त्यामुळे मुंबई महापालिकेने २०१९ च्या परिपत्रकात आता नव्याने अट समाविष्ट केली आहे. त्यानुसार ना विकास क्षेत्रात (एनडीझोन) किंवा सागरी नियमन क्षेत्रात (सीआरझेड) तात्पुरते स्टुडिओ उभारण्यासाठी आता सक्षम प्राधिकरणाची परवानगी आवश्यक करण्यात आली आहे.

विकास नियंत्रण नियमावलीत या नव्या नियमाचा अंतर्भाव करण्यासाठी फेरबदल करावा लागणार आहे. त्याकरीता फेरबदलाचा प्रस्ताव मुंबई महापालिकेच्या विकास नियोजन विभागाने तयार केला असून त्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या हरकती व सूचनांचा विचार करून हा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. नव्या अटीनुसार चित्रपट / टीव्ही मालिका / नाटके / जाहिरात / माहितीपट यांच्या चित्रीकरणासाठी तात्पुरता स्टुडिओ / सेट केवळ संबंधित सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीनंतरच ठराविक भागात उभारता येईल. नियमावलीतील या सुधारणेला पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी ८ मे २०२५ रोजी मंजुरी दिली आहे.

## बँकेची ७६४ कोटींची फसवणूक प्रकरणी; ईडीकडून ८१ कोटी ८८ लाखांच्या मालमत्तेवर टाच

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

सक्त वसुली संचालनालयाने (ईडी) ७६४ कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात सुमारे ८१ कोटी ८८ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली. ही कारवाई मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) २०२० अंतर्गत करण्यात आल्याची माहिती ईडीने दिली. या प्रकरणात विंध्यवासिनी ग्रुप ऑफ कंपनीचे प्रवर्तक विजय राजेंद्रप्रसाद गुप्ता, अजय आर. राजेंद्रप्रसाद गुप्ता आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाची (एसबीआय) ७६४ कोटी ४४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

सीबीआयच्या गुन्ह्यावरून ईडीकडून तपासकेंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी भारतीय दंड विधान आणि लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यात आरोपी विजय गुप्ता आणि अजय गुप्ता यांनी बँकेचे अधिकारी, सनदी लेखापाल (सीए), कर्ज सल्लागार आणि इतर आरोपींच्या मदतीने संगनमत करून ही फसवणूक केली. बनावट कागदपत्रांच्या साह्याने कंपनींच्या नावे विविध



कर्ज व पत सुविधा घेतल्याचा आरोप आहे. या रकमेचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी आणि इतर अनधिकृत कारणांसाठी करण्यात आला. त्यामुळे एसबीआयला ७६४ कोटी ४४ लाख रुपयांचे नुकसान झाले. या गैरव्यवहारातील रक्कम व्यवहारात आणण्यासाठी बनावट कंपन्यांचा वापर केल्याचा आरोप आहे. फसवणुकीची रक्कम ५० हून अधिक बनावट कंपन्यांच्या माध्यमातून व्यवहारात आणण्यात आली. त्यानंतर त्यातील ४२ कोटी रुपये रोख स्वरूपात काढण्यात आल्याची माहिती ईडीने दिली. या रकमेचा वापर करून आरोपींनी स्वतःच्या, कुटुंबीयांच्या आणि बेनामी व्यक्तींच्या नावे स्थावर मालमत्ता खरेदी केल्या. याबाबतची माहिती ईडीला तपासात मिळाली. ईडीच्या तपासानुसार सिल्वासा आणि महाराष्ट्र येथे मिल्स खरेदीसाठी विविध कंपन्यांच्या नावाने टर्म लोन आणि कॅश क्रेडिट सुविधा घेण्यात आल्या होत्या. तसेच, राजपूत रिटेल लिमिटेड या कंपनीच्या नावाने मॉल बांधणी आणि व्यावसायिक इमारतीच्या खरेदीसाठी कर्ज घेण्यात आले. कर्जाची रक्कम मिळवण्यासाठी बनावट व फुगवलेले करार दाखवण्यात आले. त्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे

**महाराष्ट्र शासन**

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

ई -निविदा सुचना क्र. ९० (फेरनिविदा) सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमून्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | मलबार हिल ,मुंबई येथे नंदनवन बंगलो अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, शौचालयाचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट प्रदान करणे, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ३९.७२ |
| २ | मलबार हिल, मुंबई येथे सातपुडा बंगलो अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, शौचालयाचे नूतनीकरण, प्रदान करणे, स्टोरेज युनिट, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ५४.२३ |
| ३ | मलबार हिल, मुंबई येथे पर्णकुटी बंगलो अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, टॉयलेटचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट प्रदान करणे वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन, पर्णकुटी बंगलो दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ५३.४१ |
| ४ | मलबार हिल, मुंबई जेतवन बंगलो, येथे अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोअरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, शौचालयाचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट प्रदान करणे, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन प्रदान करणे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ४२.७२ |
| ५ | मलबार हिल, मुंबई शिवनेरी बंगलो येथे अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, शौचालयाचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन प्रदान करणे, दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ५३.०८ |
| ६ | मलबार हिल, मुंबई येथे अग्रदूत बंगलो अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, टॉयलेटचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट प्रदान करणे, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ४०.२२ |
| ७ | मलबार हिल, मुंबई मुक्तागीरी बंगलो येथे अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे आणि खिडक्या, शौचालयाचे नूतनीकरण, स्टोरेज युनिट प्रदान करणे, वॉल पॅनेलिंग, सोफा आणि कुशन प्रदान करणे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ५२.४२ |
| ८ | जुने जकात घर मुंबई येथील डी. डी. इमारत आवारातील पॉलिमर मोर्टर, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, दरवाजा, खिडक्या, रंगकाम, प्रसाधनगृह, दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | १९.७७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १९.५.२०२५ ते दि. २६.५.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. २७.५.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ५५८०
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १६|५|२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/७२६

## ९५ प्राधिकरणे, महामंडळांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सर्वोत्कृष्ट

■ **मुंबई : सम्यक कासारे**

मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील सुमारे ९५ प्राधिकरणे, शासकीय- निमशासकीय संस्था, शासकीय कंपन्या तसेच महामंडळांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. मुख्यमंत्र्यांनी हा कार्यक्रम जाहीर करण्याआधीच प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी कार्यालयाचे नुतनीकरण सुरु केले होते. कार्यालयास कॉर्पोरेट स्वरुप देतानाच प्रामुख्याने झोपडीधारकांना पाणी व स्वच्छतागृह असलेला अभ्यागत कक्ष उभारण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे झोपडीवासीयांना आता प्राधिकरणात ताटकळत राहावे लागत



नाही. झोपडीवासीयांच्या नेमक्या समस्या जाणून घेण्यासाठी अधिकाऱ्यांचे पथक तेव्हाच नियुक्त केले. त्यावेळी सर्वाधिक तक्रारी भाडे न मिळाल्याच्या असल्याचे स्पष्ट झाल्यावर त्यांनी लगेच संकेतस्थळ अद्ययावत करताना भाडे व्यवस्थापन प्रणाली सुरु केली. त्यामुळे भाड्याच्या तक्रारी शून्यावर आल्या. झोपडीधारकांना आता थेट ऑनलाईन तक्रारी दाखल करता येऊ लागल्या आहेत. या तक्रारींच्या सद्यस्थितीबाबत लघुसंदेशही मिळू लागले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून चॅटबोटद्वारे झोपडपट्टी पुनर्विकासाची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिवाय प्राधिकरणातील सुमारे पाच कोटी कागदपत्रे संगणकावर उपलब्ध झाल्यामुळे आता माहिती अधिकारातही ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,
दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

ई -निविदा सुचना क्र. ८ सन २०२५-२०२६

(फक्त मुंबई उपनगर जिल्हा – पुर्व उपनगरे मजुर सहकारी संस्था यांचे साठी )

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पुर्व उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. नमुद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . ९ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. २१५२४१६/- |
| २ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.९ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३४३०७३३/- |
| ३ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . ११ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. १९६८८०९/- |
| ४ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.११ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३४३३३२१/- |
| ५ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १२ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. १९४०४९५/- |
| ६ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.१२ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३४३३१२६/- |
| ७ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १३ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. १५०४२६३/- |
| ८ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.१३ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३०११५०८/- |
| ९ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १४मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. २०२४२४०/- |
| १० | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.१४ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३४४८२३६/- |
| ११ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १५ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. २०२३७०६/- |
| १२ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.१५ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे | रु. ३४३३९२६/- |
| १३ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १६ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. २०२३१७१/- |
| १४ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र.१६ मधील सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती, शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे करणे. | रु. ३४३३१००/- |
| १५ | मुळगोण कामांतर्गत ९८० रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथील इमारत क्र . १७ मध्ये बाहय गिलावा, खिडक्यांच्या लोखंडी जाळया बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु. २०२१०३२/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदाउपलब्धकालावधी- दि. १५/०५/२०२५ ते दि.२२/०५/२०२५ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि.२३/०५/२०२५**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/3263
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :. 09|05|25

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/६६२

# पीएमएलए कायदा ही यूपीएची चूक, कठोर तरतुदी रद्द करणे आवश्यक; शरद पवार यांचे स्पष्ट मत

**मुंबई : नितीन देवळेकर**

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळात मनी लॉडरिंग प्रतिबंधक (पीएमएलए) कायद्याला तीव्र विरोध केला होता. हा कायदा अत्यंत घातक आहे, राज्य बदलले की या कायद्याचा परिणाम आपल्यालाही भोगावा लागेल असे मी त्या वेळी निदर्शनास आणून दिले होते. पण माझे ऐकले गेले नाही. सत्ताबदल झाल्यावर त्याचा पहिला फटका माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांना बसला. विरोधकांना उद्ध्वस्त करणाऱ्या कायद्यातील कठोर तरतूद रद्द केली पाहिजे, असे स्पष्ट मत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांना सक्तवसुली अंमलबजावणी संचालनालयाने अटक केल्यानंतर तुरुंगातील दिवसांच्या अनुभवावर 'नरकातील स्वर्ग' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, ज्येष्ठ लेखक जावेद अख्तर, तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले यांच्या उपस्थितीत पार पडला. केंद्रीय तपास यंत्रणांचा राजकीय हेतूने वापर करण्यात येत असल्याचा आरोप पवार यांनी केला. अंमलबजावणी संचालनालयाने केलेल्या तपासात संजय राऊत यांचा संबंध नसताना त्यांना गुंतवले गेले. सत्तेचा गैरवापर केला जात आहे. एका बांधकाम व्यावसायिकाला देण्यात आलेले ५८ कोटी रुपये प्रकरणांची माहिती राऊत यांनी केंद्रातील वरिष्ठ नेत्यांना दिली. त्यानंतर राऊत यांना अटक करण्यात आली. महाराष्ट्रात काही



लोक चुकीचे काम करत होते, हे माहीत असताना त्यांच्यासंबंधी कारवाई होत नव्हती. राऊत यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे आम्हाला स्थिती कळली. ती स्थिती दुरुस्त करण्याचा विचार आज ना उद्या करावा लागेल. एकनाथ ख़डसे यांच्या जावयालाही अशाच प्रकारे अटक करण्यात आली होती, असेही पवार यांनी सांगितले. विरोधकांना तुरुंगात टाकून सरकार चूक करीत आहे. तुरुंगात गेल्यानंतर विरोधक विचार करतात आणि ते सरकारला त्रासदायक ठरते. तुरुंगात आतापर्यंत महान साहित्य निर्माण झाले आहे. राऊत यांनी तुरुंगाबाहेरही लिहीत राहावे असे मत जावेद अख्तर यांनी व्यक्त केले. मला नेहमीच दोन्ही बाजूंकडून दोष दिला जातो. काहीजण मला पाकिस्तानमध्ये जाण्याचा सल्ला देतात त्या वेळी पाकिस्तान अथवा नरक निवडण्याची वेळ आल्यास मी नरक निवडेन पण पाकिस्तान नाही असे अख्तर यांनी स्पष्ट केले. सरकारे येतात आणि जातात. हे सरकारही उद्या जाणार आहे. या सरकारने स्वर्गासारख्या भारत देशाचा नरक केला आहे. त्याचा पुन्हा स्वर्ग बनवायचा असेल तर हे सरकार आपल्याला घालवावेच लागेल. त्यासाठी लढणारी नवीन पिढी तयार करावी लागेल. हुकूमशहा कोणीही असला तरी त्याला एक दिवस जावेच लागते, असे परखड मतही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले.

## कॉंक्रिटीकरणाची कामे २० मेला बंद, उर्वरित कामे पूर्ण करण्यावर भर

**मुंबई : विशाल कारंडे**


पावसाळा तोंडावर आल्यामुळे रस्ते कॉंक्रिटीकरणाच्या कामांना महानगरपालिका प्रशासनाने वेग दिला असून ३० मेपर्यंत कामे पुर्ण करण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. तसेच, येत्या २० मेनंतर रस्त्यांवर कॉंक्रीट टाकले जाणार नाही. त्यानंतर कॉंक्रीटीकरणाव्यतिरिक्त अंतिम टप्प्यातील उर्वरित कामे पूर्ण करण्यावर भर देण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. उर्वरित रस्त्यांवर आवश्यकतेनुसार मास्टिक अस्फाल्ट टाकून रस्ते वापरायोग्य करण्यात येणार आहेत. मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेली रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. पावसाळा तोंडावर आल्यामुळे कॉंक्रीटीकरणाच्या कामांना वेग देण्यात आला आहे. संबंधित कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर सातत्याने रस्ते कामांची पाहणी करीत आहेत. महापालिकेने रस्त्यांच्या कामासाठी दिलेली मुदत जवळ आली असून अनेक भागांमधील कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे येत्या २० मेपर्यंत पेव्हमेंट क्वालिटी कॉंक्रीट टाकण्याचे काम पूर्ण करण्याचे आव्हान अभियंते व कामगारांसमोर आहे. पेव्हमेंट क्वालिटी कॉंक्रिट टाकल्यानंतर रस्तेबांधणीची अखेरची कामे केली जाणार आहेत. त्यात थर्मोप्लास्ट, कॅट आईज, दिशादर्शक फलक, वाहतूक सुरक्षा चिन्हे, जंक्शन ग्रीड आदींचा समावेश असेल.

## सरकारी शैक्षणिक संस्थांमधील अपंगांसाठीच्या राखीव रिक्त पदांचा मुद्दा न्यायालयात; राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

**मुंबई : गणेश बागडे**

**राज्यभरातील सरकारी आणि अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये अपंग व्यक्तींसाठी राखीव असलेली पदे अद्यापही रिक्त असल्याचा मुद्दा जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयात मांडण्यात आला आहे. तसेच, ही रिक्त पदे भरण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकेची न्यायालयानेही दखल घेतली असून सरकारसह संबंधित विभागांना या प्रकरणी भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.**

अपंग व्यक्तींसाठी अनिवार्य आरक्षणाची (पीडब्ल्यूडी) योग्य ती अंमलबजावणी न केल्याबद्दल मिशन ॲक्सेसिबिलिटी या संस्थेने उच्च न्यायालयात जनहित याचिका केली आहे.



मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठापुढे नुकतीच या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागासह अपंग कल्याण विभाग आणि महाराष्ट्र राज्य अपंग आयुक्तालयाला (एससीपीडी) याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

राज्य सरकारच्या २०१९ च्या अध्यादेशानुसार, अपंग व्यक्तींसाठी चार टक्के वैधानिक आरक्षण लागू करण्याच्या कायदेशीर आदेशाची अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी ठरले आहे. राज्यभरातील उच्च आणि तंत्र शिक्षण संस्थांमध्ये अपंग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या जागा ९९.९९ टक्के रिक्त असल्याचे एससीपीडीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत असल्याचा दावाही याचिकाकर्त्यांनी याचिकेत केला आहे.

एका ७५ टक्के कमी दृष्टी असलेल्या उमेदवाराकडे पीएचडी, यूजीसी-नेट आणि एसईटी पात्रता असूनही त्याला वारंवार कायमस्वरूपी शिक्षक पदे नाकारण्यात आले. अखेर त्याला ग्रँटेबल कॉन्ट्रॅक्ट अवर बेसिसवर (जीसीएचबी) फक्त तात्पुरते पद देण्यात आले. तथापि, कामासाठी अयोग्य परिस्थिती आणि कमी दृष्टी असलेल्या व्यक्तीसाठी योग्य सोयीसुविधांच्या अभावामुळे संबंधित उमेदवाराने कंत्राटी पदावरून राजीनामा दिला. अपंगांना नोकरीची संधी देण्याबाबत होणारा भेदभाव दाखवणारे हे उत्तम उदाहरण आहे.

## पुनर्विकासातील विकासक निवडीत निबंधकांचा भ्रष्टाचारी सहभाग थांबवा! मुंबई ग्राहक पंचायतीकडून सूचना

**मुंबई : राकेश गायकवाड**

पुनर्विकास प्रकल्पासाठी विकासक निश्चित करण्याच्या सभेसाठी उपनिबंधक कार्यालयांकडून होत असलेला भ्रष्टाचार थांबवून ही प्रक्रिया पारदर्शक व्हावी, यासाठी तरतूद करण्याची मागणी मुंबई ग्राहक पंचायतीने केली आहे. त्यामुळे विकासक निवडीत होणार भ्रष्टाचार टळेल व रहिवाशांना पारदर्शक पद्धतीने विकासकाची निवड करता येईल, असे पंचायतीने हरकती व सूचना सादर करताना म्हटले आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमात दुरुस्ती करण्याबाबत राज्य शासनाने सर्व संबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. प्रस्तावित नियमांत काही दुरुस्त्या सुचवतानाच मुंबई ग्राहक पंचायतीने पुनर्विकासाबाबत नव्याने काही महत्त्वाच्या सूचना शासनाला केल्या असून त्यातील विकासक निवडीत निबंधकांचा फार मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचारी सहभाग त्वरित थांबवण्याची आग्रही मागणी या निमित्ताने केली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ७९ (अ) द्वारे प्रकाशित ४ जुलै २०१९ च्या पुनर्विकासाबाबत समग्र सूचना या नव्या नियमांत अंतर्भूत असाव्यात अशी सूचना मुंबई ग्राहक पंचायतीने केली आहे. त्यामुळे या सूचना बंधनकारक आहेत की केवळ मार्गदर्शक



स्वरूपातील आहेत याबाबतचे आजवरचे वाद, तंटे, कोर्टकज्जे आणि उलटसुलट निर्णय आपसूकच निकालात निघतील असे मुंबई ग्राहक पंचायतीने आपल्या निवेदनात म्हटले आहे. पुनर्विकासासाठी विकासक निवडीसाठी जी विशेष सर्वसाधारण सभा बोलावली जाते त्यात निबंधक कार्यालयाने आपला एक प्रतिनिधी या संपूर्ण निवड प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार वा कोणावरही दडपण न आणता विकासक निवड प्रक्रिया पारदर्शकपणे होईल हे बघण्यासाठी नेमणे बंधनकारक आहे.

## मुंबईत एडिस डासांची २ लाखांहून अधिक उत्पत्तीस्थाने; महापालिकेच्या ॲप, लघुपटांतून उत्पत्तीच्या ठिकाणांची माहिती मिळणार

**मुंबई : सम्यक कासारे**

डेंगी हा एक विषाणूजन्य आजार असून तो एडिस डास चावल्याने होतो. पावसाळ्यात डासांच्या प्रादुर्भावाने हा रोग पसरण्याची दाट शक्यता असते. तसेच, जानेवारी २०२४ पासून आतापर्यंत मुंबईत तब्बल २ लाख १७ हजार ९८१ उत्पत्तीस्थाने आढळली आहेत. महानगरपालिकेमार्फत संबंधित भागांमध्ये धूम्रफवारणी सुरु असून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर भर दिला जात आहे. 'भाग मच्छर भाग' आणि 'मुंबई अगेन्स्ट डेंगी' या मोबाईल ॲपमधून शाळा, महाविद्यालये, शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये डास प्रतिबंधात्मक उपाययोजनांची जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच, डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे कोणती आणि ती कशी ओळखावी, याबाबतचीही माहिती नागरिकांना ॲपमधून मिळणार आहे.

डासांची उत्पत्तीस्थाने शोधून त्यांचे उच्चाटन करण्यासोबतच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या




कीटकनाशक विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. राष्ट्रीय डेंगी दिन १६ मेच्या निमित्ताने यंदाचे 'तपासा, स्वच्छ करा, झाकून ठेवा – डेंगीला हरविण्याचे उपाय करा' हे घोषवाक्य आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या कीटकनाशक विभागाने तंत्रज्ञानावर आधारित पुढाकार घेत 'भाग मच्छर भाग' आणि 'मुंबई अगेन्स्ट डेंगी' या मोबाईल ॲपचा पर्याय नागरिकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. हिवताप, डेंगी आणि चिकुनगुनिया आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियंत्रणासाठी लघुपटांच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. जानेवारी २०२४ ते मे २०२५ दरम्यान एकूण २ लाख १७ हजार ९८१ उत्पत्तीस्थाने आढळली आहेत. यापैकी, जानेवारी ते ६ मे २०२५ या कालावधीत सर्व विभागांमध्ये दिलेल्या भेटीत एकूण २५ हजार १६९ ठिकाणी एडिस डासांची उत्पत्तीस्थाने आढळली.

## राज्यात उच्च रक्तदाबाचे रुग्ण सर्वाधिक!

**मुंबई : सचिन कदम**

बदलती जीवनशैली, मानसिक तणाव, अपुरी झोप याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून त्यात उच्चरक्तदाब असलेल्या रुग्णांची संख्या अन्य आजारांच्या तुलनेत अधिक आहे.राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय असंसर्गजन्यरोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३० वर्षांवरील नागरिकांची उच्च रक्तदाब तपासणी करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ या मध्ये १,३६,४५,९९४ नागरिकांची उच्च रक्तदाब तपासणी करण्यात आली, त्यापैकी २३,८७,३०८ रुग्णांना उच्च रक्तदाब असल्याचे निदान करण्यात आले असून त्यांच्यावर आरोग्य विभागामार्फत पाठपुरावा करून उपचार करण्यात येत आहेत. या वर्षी १६ मे पर्यंत ३१,२३,९२१ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी उच्च रक्तदाबाचे निदान झालेल्या ५,१०,६३२ रुग्णांवर उपचार सुरु आहेत.

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, तृतीयक केंद्रे, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र या स्तरावर आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. असंसर्गजन्य रोग (नॉन कम्युनिकेबल डिसीज – एनसीडी) हा एक



आजार आहे, जो एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला संक्रमित होत नाहीत. यानुसार असंसर्गजन्य आजारांमध्ये कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब आदी आजारांचा समावेश होतो. असंसर्गजन्य आजाराची लक्षणे दिसून आल्यानंतर वैद्यकीय उपचार सुरू करणे हा सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो. प्राथमिक अवस्थेत निदान झाल्यास या आजारांवर नियंत्रण मिळविणे आणि उपचाराने हे आजार बरे होतात असे डॉक्टरांनी सांगितले. रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी वेळीच निदान होणे गरजेचे असून त्यासाठी नियमित तपासणी आवश्यक आहे. राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उच्च रक्तदाब चाचणी आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत. नागरिकांनी या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. उच्च रक्तदाबाची काही प्रमुख लक्षणे असून यात डोकेदुखी,छातीत दुखणे, चक्कर येणे, दृष्टीभ्रम,नाकातून रक्त येणे, थकवा,हृदयाची धडधड, श्वासोच्छ्वासाला त्रास,धाप लागताना दिसते. उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी-आहारामध्ये तेल, तुप व मीठ यांचा कमी प्रमाणात वापर करावा.संतुलित आहार, फळे, भाज्या यांचे भरपूर प्रमाणात सेवन करावे,तंबाखू आणि मद्य सेवन टाळावे,नियमित व्यायाम अथवा योगासने करावी. वजन नियंत्रित ठेवावे. तसेच रक्तदाबाची नियमित चाचणी करून आवश्यकतेनुसार डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

## मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाच्या आरोपांचे प्रकरणः मीरा रोड येथील हॉटेल व्यावसायिकाला अटकेपासून संरक्षण नाहीच

**मुंबईः आकाश कांबळे**

मानवी तस्करी आणि वेश्या व्यवसायाच्या आरोपाप्रकरणी मीरा रोड येथील हॉटेल व्यावसायिक सुरेश शेट्टी याला अटकेपासून संरक्षण देण्यास उच्च न्यायालयाने नुकताच नकार दिला. मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाच्या आरोपाप्रकरणी मीरा रोड येथील काशीगाव पोलिसांनी शेट्टी याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर, शेट्टी याने अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी आधी कनिष्ठ न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, तेथे दिलासा न मिळाल्याने त्याने उच्च न्यायालयात धाव घेऊन अटकपूर्व जामीन मंजूर करण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या एकलपीठाने शेट्टी याची अटकपूर्व जामिनाची मागणी फेटाळली. तो तपासात सहकार्य करत नाही. तसेच, अल्पवयीन पीडितांशी संबंधित अशाच प्रकारच्या आणखी एका गुन्ह्यात त्यांचा सहभाग असल्याचे सकृतदर्शनी उघड झाले आहे. या सगळ्या बाबींचा विचार करता शेट्टी याला अटकेपासून संरक्षण देता येणार नाही, असे एकलपीठाने त्याला दिलासा नाकारताना स्पष्ट केले. शेट्टी याने अटकपूर्व जामिनाची मागणी करताना केलेले दावेही न्यायालयाने फेटाळले. त्यानंतर, दोन आठवड्यांसाठी अटकेपासून अंतरिम संरक्षण देण्याची मागणी शेट्टी



याच्याकडून करण्यात आली. तीही न्यायालयाने अमान्य केली. त्यानंतर, याचिका मागे घेण्याची विनंती शेट्टी याने न्यायालयाकडे केली. तथापि, आरोपांचे गांभीर्य आणि पोलिसांनी सादर केलेले पुरावे लक्षात घेऊन शेट्टी याची ही मागणीही मान्य करण्यास न्यायालयाने नकार दिला.

मीरा रोड येथील हॉटेल साई रेसिडेन्सीवर टाकलेल्या छाप्यादरम्यान मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाचे हे प्रकरण उघडकीस आले. छाप्यादरम्यान दोन अल्पवयीन मुलींसह चौघींची पोलिसांनी सुटका केली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली. तर हॉटेल अँक्वाचा संचालक आणि हॉटेल साई रेसिडेन्सीच्या शेट्टी याला फरारी दाखवण्यात आले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**

**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**

E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र. १० सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- १५/५/२०२५ ते दिनांक- २२/५/२०२५ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- २३/५/२०२५ दुपारी १७/- वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रशासकिय इमारत वांद्रे पुर्व येथील इमारतीच्या टेरेसवर अनुषांगिक कामे करणे | रु.८०५००३/- |
| २ | नागरी स्वास्थ केंद्र येथील सिंटेक्स पाण्याची टाकी बसविणे व इतर अनुषांगिक कामे करणे | रु.८३५३३१/- |
| ३ | प्रशासकिय इमारत वांद्रे पुर्व प्रवेशद्वाराजवळ वर्टीकल गार्डन उभारणे | रु.६१७१०४/- |
| ४ | प्रशासकिय इमारत वांद्रे पुर्व येथील जनरेटर रूमची दुरूस्ती करणे | रु.८१०२५५/- |
| ५ | नागरी स्वास्थ केंद्र येथील ड्रेनेज पाण्याची गळती रोखण्यासाठी भूमिगत पाण्याच्या टाकीची दुरुस्ती | रु.८४३४०८/- |
| ६ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय यांच्यासाठी प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर एमएस विंडो ग्रिलची व्यवस्था आणि दुरुस्ती करणे | रु.८४०६१८/- |
| ७ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ येथे या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर UPVC खिडक्या बसवणे आणि दुरुस्त करणे. | रु.८३१९६३/- |
| ८ | अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ येथे या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर UPVC खिडक्या बसवणे आणि दुरुस्त करणे. | रु.८३६००८/- |
| ९ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ येथे आयोगासाठी तात्पुरते कार्यालय उभारणे | रु.८३०८६२/- |
| १० | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय यांच्यासाठी प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर विद्यमान विभाजने आणि विविध फर्निचर पाडणे | रु.८२७५७२/- |
| ११ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय यांच्यासाठी प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर अतिरिक्त विविध फर्निचरची कामे करणे | रु.८४००३४/- |
| १२ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगरीय यांच्यासाठी प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१ या कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर अतिरिक्त स्थापत्य कामे करणे | रु.८३८४४१/- |
| १३ | अंधेरी (पू), मुंबई येथे टाईप २ स्टाफ क्वार्टर्स बिल्डिंग नंबर १ व २ एम.आय.टी.सी येथे टेरेस वॉटरप्रूफिंगचे काम करणे. | रु.७८६५८७/- |
| १४ | अंधेरी (पू), मुंबई येथे टाईप ३ स्टाफ क्वार्टर्स बिल्डिंग नंबर २ एम.आय.टी.सी येथे टेरेस वॉटरप्रूफिंगचे काम करणे. | रु.७३६४७१/- |
| १५ | अंधेरी (पू), मुंबई येथे टाईप ४ स्टाफ क्वार्टर्स बिल्डिंग नंबर १ एम.आय.टी.सी येथे टेरेस वॉटरप्रूफिंगचे काम करणे. | रु.५७८७६९/- |
| १६ | अंधेरी (पू), मुंबई येथे टाईप ४ स्टाफ क्वार्टर्स बिल्डिंग नंबर ३एम.आय.टी.सी येथे टेरेस वॉटरप्रूफिंगचे काम करणे. | रु.५७३८९०/- |
| १७ | प्रशासकीय इमारत , अंधेरी (प), मुंबई येथील तळ, पहिला व दुसरा मजला येथील कार्यालयाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.८३६१००/- |
| १८ | प्रशासकीय इमारत , अंधेरी (प), मुंबई येथील तळ, पहिला व दुसरा मजला येथील कार्यालयाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.८३६१००/- |
| १९ | प्रशासकीय इमारत , अंधेरी (प), मुंबई येथील तळ, पहिला व दुसरा मजला येथील कार्यालयाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.५५६६००/- |
| २० | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे | रु.७६६९६१/- |
| २१ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे | रु.७६६९६१/- |
| २२ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.७६६९६१/- |
| २३ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.७६६९६१/- |
| २४ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.७६६९६१/- |
| २५ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.७६६९६१/- |
| २६ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.७६६९६१/- |
| २७ | अंधेरी पुर्व, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अपना घर विश्रामगृहाची दैनंदिन साफसफाई करणे. | रु.५११३०८/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/3265 दिनांक :- 09/05/25

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/६६४

# दहिसर तिहेरी हत्याकांड; जुन्या वादातून दोन कुटुंबियाचा एकमेकांवर कोयत्याने हल्ला

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मुंबईमध्ये कौटुंबिक वादातून धक्कादायक घटना घडली आहे. दहिसरमधील गणपत पाटील नगर मध्ये वास्तव्यास असणाऱ्या दोन कुटुंबांत तुफान हाणामारी झाली. ज्याचे रुपांतर नंतर हत्त्येत झाले आणि तीन जणांना मृत्यू झाल्याचे खळबळजनक वृत्त आहे. दोन कुटुंबात वाद इतका विकोपाला गेला होता की, चाकू आणि कोयत्याने एकमेकांवर वार करण्यात आले. जुन्या वादातून ही भयंकर घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या दहिसर पश्चिम एम. एच.बी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणपत पाटील नगर परिसरात दुपारी ४.३० च्या सुमारास ही भयंकर घटना घडली आहे. हमीद शेख (वय ४९ वर्षे), रमणलाल गुप्ता (वय ५० वर्ष) आणि अरविंद गुप्ता (वय २३ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. जुन्या वादाच्या रागात दोन कुटुंब एकमेकांवर धावून गेले आणि तुफान राडा झाला. यामध्येच तेथील एका दुकानातून दोन्हीकडील लोकांनी चाकू आणि कोयता विकत घेतले. आणि पुन्हा दोन्हीकडून एकमेकांवर जोरदार हल्ला करण्यात आला. परिणामी तिघांचा जीव गेला आहे, तर ४ जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी एम.एच.बी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, एम एच बी पोलीस ठाणे हद्दीतील गणपत नगर झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या शेख व गुप्ता या दोन कुटुंबांनी २०२२ मध्ये एकमेकांविरोधात गुन्हे दाखल केले होते. तेव्हापासून दोन्ही कुटुंबांचे वैर होते. रविवारी दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास राम नवल गुप्ता यांच्या नारळ विक्री स्टॉल समोर अमित शेख हा दारू पिऊन आला आणि त्यांच्यात वाद सुरु झाला.




एवढ्यात दोघांनीही त्यांची मुलं अमर गुप्ता, अरविंद गुप्ता व अमित गुप्ता. तर हमीद यांची मुलं अरमान हमीद शेख व हसन हमीद शेख यांना बोलावून घेतले. सगळे येताच जोरदार वाद उफाळला. वाद इतका विकोपाला गेला की, वादाचे रुपांतर हाणामारीत झाले, धारदार शस्त्राने वार करण्यात आले. सदर मारहाणीमध्ये राम नवल गुप्ता (वडील) आणि अरविंद गुप्ता यांचा मृत्यू झाला आहे. तर अमर गुप्ता व अमित गुप्ता जखमी आहेत. तसेच हमीद शेख (वडील) हे देखील मृत पावले आहेत. त्यांचा मुलगा अरमान शेख व हसन शेख जखमी आहेत. शताब्दी हॉस्पिटल येथून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवला असून, एका आरोपीला पोलीस कोठडी ठोठावण्यात आली असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला रुग्णालयात दाखल करावे लागले. पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत आणि परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

# अनधिकृत बांधकामप्रकरणी 'ईडी'चे छापे; पालिका अधिकाऱ्याकडे मिळाले ३० कोटींचे घबाड

■ **विरार : विशेष प्रतिनिधी**

नालासोपारा मधील ४१ अनधिकृत इमारतीच्या घोटाळा प्रकरणात वसई-विरार महापालिकेचे वादग्रस्त अधिकारी व नगररचना उपसंचालक वाय.एस. रेड्डी यांचा सहभाग ईडीच्या तपासात उघड झाला. ईडीच्या कारवाईत रेड्डी यांच्या हैदराबाद येथील निवासस्थानी ८.६ कोटी रोकड व २३.२५ कोटीचे दागिने जप्त केले आहेत. ईडीने मुंबई, वसई-विरार व हैदराबादमध्ये १३ ठिकाणी हे छापे टाकले होते. ही कारवाई गुरुवारपर्यंत सुरू होती. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील ४१ अनधिकृत इमारत जमीनदोस्त केल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) या घोटाळ्याची चौकशी सुरू केली आहे. या अनधिकृत इमारती माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व अनिल गुप्ता व त्यांच्या सहकाऱ्यांनी बांधल्या होत्या. या प्रकरणात रेड्डी जबाबदार असल्याची तक्रार माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी ईडीकडे केली होती. त्यानुसार





मार्च महिन्यापासून ईडी या प्रकरणाची चौकशी करत आहे. वसई-विरार महापालिकेत वाय. एस. रेड्डी यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली आहे. रेड्डी हे सुरुवातीला सिडकोतील अधिकारी होते. पालिका स्थापन झाल्यानंतर प्रतिनियुक्तीवर आले होते. फेब्रुवारी २०१२ मध्ये त्यांची पालिकेच्या उपसंचालक पदावर नियुक्ती करण्यात आली होती. एप्रिल २०१६ मध्ये शिवसेनेचे माजी नगरसेवक धनंजय गावडे यांना २५ लाखांची लाच देताना रेड्डी यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडून पकडण्यात आले. त्यानंतर रेड्डी हे मुळात सिडकोचे अधिकारी असल्याने त्यांना पालिकेने सिडकोकडे पाठवले. ९ मे २०१६ रोजी सिडकोने त्यांना निलंबित केले व त्यांची चौकशी सुरू केली होती.

- नालासोपारा येथे सुमारे ३० एकर क्षेत्रफळावर बेकायदेशीरपणे ४१ राहिवासी व व्यावसायिक इमारती उभारल्याचे निष्पन्न झाले आहे.
- प्रत्यक्षात या भूखंडावर सांडपाणी प्रक्रिया केंद्र व कचरा डेपोचे आरक्षण होते. पण आरोपींनी संगनमत करून या ठिकाणी अनधिकृत बांधकाम केले.
- त्यासाठी आरोपी बांधकाम व्यावसायिक आणि स्थानिक दलालांनी मंजुरीची बनावट कागदपत्रे तयार केली होती.
- त्याद्वारे सामान्य नागरिकांचा विश्वास संपादन करून त्यांना मोठ्या प्रमाणात सदनिकांची विक्री करण्यात आली. यातून अनेकांची फसवणूक झाली.

# ठाण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; विदेशी मद्याचे ८०० बॉक्स जप्त

■ **ठाणे: विशेष प्रतिनिधी**

मुंब्रा रोड जवळ गोवा राज्यात निर्मित केलेल्या भारतीय बनावटीचे विदेशी मद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. या कारवाईत तब्बल ८०० बॉक्स मद्याचा साठा आणि टेम्पो असा ६३ लाख ९८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वाहन चालक जुल्फेकार चौधरी याला अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग कोकण विभागाचे उपअधिक्षक प्रविण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक



एक यांनी ही कारवाई केली. मुंब्रा रोड वरून गोवा निर्मिती भारतीय बनावटीची विदेशी मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती शुक्रवारी भरारी पथक क्रमांक एकला मिळाली होती. माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एम. पी. धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन. आर. महाले, आर. के. लब्दे, साहाय्यक दुय्यम निरीक्षक बी. जी. थोरात, जवान पी. ए. महाजन, एस. एस. यादव, एम. जी. शेख यांनी सापळा रचून सहाचाकी टेम्पोवर संशय आल्याने तो थांबविण्यात आला. त्यानंतर त्याची तपासणी केली असता, त्यात ८०० बॉक्स परराज्यातील भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (गोवा राज्य निर्मित) आढळून आले. दारुबंदी गुन्हा अंतर्गत ते जप्त करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्यात वापरण्यात आलेला सहा चाकी टेम्पोही जप्त करण्यात आला आहे अशी माहिती उत्पादन शुल्क विभागाने दिली.

# सराईत दुचाकीचोर कोळसेवाडी पोलिसांच्या कचाट्यात

■ **ठाणे: विशेष प्रतिनिधी**

कल्याणच्या कोळसेवाडी पोलिसांनी सराईत दुचाकी चोराला अटक करण्यात यश मिळविले आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेने केलेल्या कारवाई दरम्यान या चोरट्याकडून चोरलेली स्कूटर हस्तगत केली असून पोलिस रेकॉर्डवरील या सराईत चोरट्याकडून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पियुष मधुकर जाधव (२०, रा. अमुल निवास, काटेमानीवली नाका, कल्याण-पश्चिम) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कल्याणात दुचाक्या चोऱ्यांचे प्रमाणात वाढ झाली असल्याने कोळसेवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या वाहन चोऱ्यांचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिल्या होत्या. त्याप्रमाणे कल्याण विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि दर्शन पाटील, हवा. मिलींद बोरसे, राजेश कापडी, भागवत सैंदाणे, भगवान सांगळे, विलास जरग, नरेश दळवी, दिलीप सोनावळे, प्रदिप गिते हे पथक चोरांना जंग जंग पछाडत होते. या पथकाने लोकग्राम



सर्कल जवळ मंगळवारी दुपारपासून सापळा लावला होता. या सापळ्यात सायंकाळी साडेसातच्या सुमारास पियुष जाधव हा अलगद अडकला. त्याच्याकडून एम एच ०४/ एल यू /३१९४ क्रमांकाची नवी कोरी स्कूटर हस्तगत केली. चौकशी दरम्यान अटक करण्यात आलेला पियुष जाधव हा पोलिस रेकॉर्डवरील सराईत दुचाकी चोर असल्याचे उघडकीस आले.

# पुण्यात हवाई दलाच्या तोतया जवानाला बेड्या, गुप्तचर यंत्रणेने आरोपीच्या घरी छापा टाकला अन्...

■ **पुणे : विशेष प्रतिनिधी**

पुणे शहरात बनावट भारतीय हवाई दलाचा जवान असल्याची बतावणी करून फसवणूक करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई दक्षिणी कमांडच्या मिलिटरी इंटेलिजन्स विभाग आणि खडकी पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली आहे. बनावट पोशाख परिधान करून लोकांची दिशाभूल करणाऱ्या या संशयिताला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. पुणे पोलिसांनी रविवारी या घटनेची अधिकृत माहिती पत्रकार परिषदेद्वारे दिली. यामुळे पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, गौरव दिनेश कुमार नावाच्या एका व्यक्तीबाबत गुप्तचर यंत्रणेला संशयास्पद हालचालींची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाईची योजना आखली. त्यानुसार, १८ मे रोजी रात्री दक्षिणी कमांड मिलिटरी इंटेलिजन्स आणि खडकी पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करत पुण्याच्या खडकी परिसरातून गौरव दिनेश कुमार याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्याच्याकडून हवाई दलाच्या जवानाची बनावट ओळख पटली आहे. पोलिसांनी कारवाई दरम्यान आरोपीच्या घराची झडती घेतली असता, त्याच्याकडून लोकांची फसवणूक करण्यासाठी वापरले जाणारे हवाई दलाशी संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या जप्त करण्यात



आलेल्या वस्तूंमध्ये हवाई दलाचे दोन टी-शर्ट, एक कॉम्बॅट पॅन्ट, एक जोडी कॉम्बॅट शूज, दोन बॅजेस आणि एक ट्रॅक सूट यांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम १६८ अंतर्गत खडकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून आरोपीची सखोल चौकशी सुरू आहे. तो नेमका कोणत्या हेतूने हवाई दलाच्या जवानाची बतावणी करत होता आणि या कृत्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही धोका निर्माण झाला आहे का? याचा तपास केला जात आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर पुणे शहरात एकच खळबळ उडाली असून, सुरक्षा यंत्रणा अधिक सजग झाली आहे. या प्रकरणासंबंधी आणखी माहिती लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. याबाबत पुणे पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे म्हणाले की, हवाई दलाचा पोशाख घालून गौरव हा अनेकांची दिशाभूल करत होता. खडकी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती एक व्यक्ती हवाई दलात असल्याचे सांगून फसवणूक करत आहे. त्या अनुषंगाने त्याच्यावर नजर ठेवली होती. मिलिटरी इंटेलिजन्स आणि पुणे पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली. त्याच्याकडून एअरफोर्सचा पोशाख, शुज, असं साहित्य ताब्यात घेण्यात आले आहे.

# तुळींज पोलिसांच्या कारवाईत नायजेरियन महिलेकडून ५.६० कोटींचे अमली पदार्थ जप्त

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

नालासोपारा शहर हे अमली पदार्थाचे केंद्र बनू लागले आहे. तुळीज पोलिसांनी शुक्रवारी सायंकाळी नालासोपारा पूर्वेच्या प्रगतीनगर परिसरात छापा टाकून ५ कोटी ६० लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी एका नायजेरियन महिलेला अटक केली आहे. तिचा साथीदार फरार आहे. नालासोपारा शहरात मोठ्या प्रमाणावर नायजेरियन देशाचे नागरिक बेकायदेशीरित्या वास्तव्य करत आहे. हे नागरिक अमली पदार्थांच्या व्यवहारात सक्रीय आहेत. नालासोपारा पूर्वेच्या प्रगती नगर परिसरात एक महिला अमली पदार्थांची विक्री करीत




असल्याची गुप्त माहिती तुळीज पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय जाधव यांनी घटनास्थळी महिला पथक तयार करून पाठविले. यावेळी एक महिला आपल्या घरातच अमली पदार्थ तयार करून विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून एम डी (मॅफेड्रोन) नावाचा अमली पदार्थ तयार करण्यासाठी लागणार कच्चा माल व इतर साहित्य असा सुमारे ५ कोटी ६० लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी नायजेरियन महिला रिटा फाती कुरेबेवू (२६) हिला अटक करण्यात आली आहे. तिचा साथीदार फरार झाला आहे. त्याच्या विरोधात तुळींज पोलीस ठाण्यात विरोधात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैज्ञानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क), २१ (क), २२,२९ सह विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून फरार असलेल्या हेन्री नावाच्या व्यक्तीचा शोध घेत असल्याचे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक राहुल फड यांनी सांगितले आहे.

# महिलेच्या अंत्यविधीनंतर अस्थी व रक्षा गायब, सोन्यासाठी चोरी की अघोरी प्रकार? नाशिकमधील घटनेने खळबळ

■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

तालुक्यातील नामपूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारानंतर रक्षा व अस्थी गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मृत महिलेचे नातेवाईक रक्षा विसर्जनासाठी जेव्हा स्मशानभूमीत पोहोचले, तेव्हा त्यांना रख व अस्थी गायब असल्याचे लक्षात आले. सुरेखा दीपक खैरनार (वय ४०) यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर नामपूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता नातेवाईक अस्थी संकलनासाठी स्मशानात गेले असता रख व अस्थी गायब असल्याचे आढळून आले. राखेत सोन्याचे दागिने असल्यामुळे चोरट्यांनी ही चोरी केली असावी, असा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. मात्र हा प्रकार केवळ चोरीपुरता मर्यादित



आहे की अघोरी कृत्याशी संबंधित आहे? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. हिंदू परंपरेनुसार विवाहित महिलेला अंत्यसंस्कारावेळी दागिने घालण्याची प्रथा आहे, त्यामुळे अनेक वेळा राखेत दागिने सापडतात. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. याआधीही अशा घटना घडल्याचा नागरिकांचा आरोप आहे. ग्रामपंचायत व पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचीही टीका करण्यात येत आहे. स्मशानभूमीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, संरक्षक भिंतीची उभारणी करावी, नशेखोरी व अघोरी प्रकारांना आळा घालावा तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक ६ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ **योग्य कंत्राटदारांकडून** खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **www.mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | गोरेगाव पूर्व येथील राजीव गांधी नगर झोपडपट्टीच्या सुरूवातीच्या भागास हाय टेन्साइल बॅरिअर देऊन दरड प्रतिबंधक काम करणे. | रु. ४०९७४४७८.००/- |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **१६/०५/२०२५** @ १५.०० पासून दिनांक **२३/०५/२०२५** @ १५.०० पर्यंत. |
| २. | प्री-बीड मिटींग | दिनांक **२०/०५/२०२५** रोजी **१५.००** वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय, सा बां. प्रादेशिक विभाग बांधकाम भवन, मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४००००१. |
| ३. | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **२६/०५/२०२५** @ १५.०० वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ 839
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- 9/5/2025

उपकार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/७०१

# देवनार कचराभूमी स्वच्छ करण्याच्या निर्णयाचे समाजवादी पक्षाकडून स्वागत, कचराभूमीच्या जागेवर रुग्णालय आणि शाळा उभारण्याची मागणी

■ मुंबई : विशाल कारंडे

देवनार कचराभूमी स्वच्छ करण्यासाठी मुंबई महापालिकेने निविदा मागवल्या असून येत्या तीन वर्षात या ठिकाणचे कचऱ्याचे डोंगर साफ करण्याचे उद्दीष्ट्य ठेवण्यात आले आहे. देवनार कचराभूमीवर कचरा साफ करण्याच्या निर्णयाचे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी स्वागत केले आहे. समाजवादी पक्षाचे मोठ्या संख्येने मतदार या भागात आहेत. देवनारची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मागितली असली तरी या जमिनीवर गोवंडी, देवनारवासियांसाठी शाळा व रुग्णालये उभारावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

देवनार कचराभूमी येथील अनेक वर्षापासूनचे ४० मीटर उंचीचे कचऱ्याचे डोंगर लवकरच हटवले जाण्याची शक्यता आहे. देवनार कचराभूमीची १२४.३ एकर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात येणार आहे. मात्र देवनार कचराभूमीवर गेल्या सुमारे शंभर वर्षापासूनचा कचरा साठला आहे. या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून ही जमीन रिकामी करण्याची मागणी धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरणाने राज्य सरकारकडे केली आहे.



कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर टाकण्यात आली असून महसूल व वन विभाग विभागाने पालिका आयुक्तांना पत्र लिहून ही जमीन रिकामी करण्याची विनंती फेब्रुवारी महिन्यात केली होती. त्यानुसार ही कचराभूमी रिकामी करण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने निविदा मागवल्या आहेत. त्यावरून आता राजकीय पक्षांमध्येही वाद रंगू लागले आहेत. त्यातच समाजवादी पक्षाचे आमदार आणि मुंबई महापालिकेतील माजी गटनेते रईस शेख यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. गोवंडी येथील रहिवाशांची दीर्घकाळापासूनची ही मागणी होती, असे त्यांनी म्हटले आहे. रईस शेख हे गोवंडी येथे माजी नगरसेवकही होते. याबाबत रईस शेख यांनी म्हटले आहे की, देवनार येथे कचराभूमी असल्यामुळे गोवंडीतील रहिवाशांना अनेक दशकांपासून भयंकर त्रास सहन करावा लागला आहे आणि आता त्यांना हा कचरा काढून टाकल्यानंतर पुनर्प्राप्त केलेल्या जागेवर रुग्णालये आणि शाळा यांसारख्या आवश्यक सामाजिक पायाभूत सुविधा मिळायला हव्यात. ही कचराभूमी शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून बंद केली पाहिजे आणि संपूर्ण प्रक्रियेत महापालिका प्रशासनाने पारदर्शकता राखली पाहिजे, अशीही सूचना रईस शेख यांनी केली.

# लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर अबू सैफुल्लाहचा खात्मा; अज्ञात हल्लेखोरांनी गोळया झाडून केली हत्या

■ श्रीनगर : वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील तब्बल ९ ठिकाणी असलेल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती समोर आली. दरम्यान, यानंतर आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर अबू सैफुल्लाह याचा खात्मा करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या सिंध प्रांतात या मोस्ट वॉंटेड दहशतवाद्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला करत त्याला ठार केल्याची



माहिती समोर आली आहे. अबू सैफुल्लाह हा भारतातील तीन मोठ्या दहशतवादी हल्ल्यांचा सूत्रधार होता. या संदर्भातील वृत्त पीटीआयच्या हवाल्याने टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.लष्कर-ए-तोयबाचा टॉ प कमांडर अबू सैफुल्लाह हा आज पाकिस्तानच्या सिंध प्रांतामधून आज दुपारी त्याच्या निवासस्थानातून बाहेर पडल्यानंतर एका क्रॉसिंगजवळ अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला आणि गोळया झाडत हत्या केली. दरम्यान, २००१ मध्ये रामपूर येथील सीआरपीएफ छावणीवर हल्ला, २००५ मध्ये बंगळुरू येथील इंडियन सायन्स कॉंग्रेसवर हल्ला आणि २००६ मध्ये नागपूर येथील आरएसएस मुख्यालयावरील हल्ला असा तीन हल्ल्याचा अबू सैफुल्लाह सूत्रधार होता. अबू सैफुल्लाह याने या तीनही हल्ल्यात महत्वाची भूमिका बजावली होती. दरम्यान, भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये युसूफ अझहर, अब्दुल मलिक रौफ आणि मुदासिर अहमद सारख्या मोठ्या दहशतवाद्यासह तब्बल १०० दहशतवाद्यांना ठार केलं. त्यानंतर काही दिवसांतच लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर अबू सैफुल्लाह याची अज्ञात हल्लेखोरांनी हत्या केली आहे. मात्र, अबू सैफुल्लाह याच्यावर नेमकी गोळया कोणी झाडल्या? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# धरण उशाला, कोरड आदिवासी पाड्याला; रानसई धरणाच्या काठावर राहूनही नागरिकांची पाण्यासाठी वणवण

■ उरण : भावना जैन

औद्योगिक परिसर आणि ग्रामपंचायतीना पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणाच्या काठावर असूनही तालुक्यातील एकमेव आदिवासी ग्रामपंचायत असलेल्या रानसईमधील सात पाड्यांतील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. हे म्हणजे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी स्थिती आहे. उरण तालुक्यातील रानसई धरणाच्या परिसरात वसलेल्या रानसई ग्रामपंचायत हद्दीतील वाड्यांतील आदिवासीना वर्षानुवर्षे तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. ज्या धरणासाठी या आदिवासीच्या जमिनीही संपादीत करण्यात आल्या आहेत. मात्र त्यांना आपल्या हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. १९६०



साली उभारण्यात आलेल्या रानसई धरण हे आदिवासींच्या जमिनीवर आहे. यात खैरकाठी आणि भुऱ्याची वाडी या दोन वाड्यांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी लाखो रुपये खर्च करून पाड्यात विहीरी बांधण्यात आल्या आहेत. त्या विहिरीतूनही पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र उन्हाळ्यात विहिरीचे पाणी तळाशी जात आहे. तर येथील बोअरवेललाही पाणी येत नाही. ही पाणी समस्या सोडविण्यासाठी मे महिन्यात दरवर्षी टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. या टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यावर हजारो रुपये खर्च केले जात आहेत. मार्गाची वाडी, खोंडपाची वाडी, बंगल्याची वाडी, सागाची वाडी यांना विहिरीचे पाणी मिळते. मात्र त्यासाठी जलवाहिनीचा वापर करावा लागत आहे.

# पिंपरी चिंचवडमधील ३६ अलिशान बंगल्यावर महापालिकेची तोंडक कारवाई

■ पिंपरी-चिंचवड : शकिल शेख

पिंपरी चिंचवड महा पालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणार्या चिखली येथील गट क्रमांक ९० मधील इंद्रायणी नदीलगतच्या निळ्या पूररेषेत उभारण्यात आलेले ३६ बेकायदा बंगले पाडण्यात आले आहेत १.८ एकर भूभागावरील सुमारे ६३,९७० चौरस फूट क्षेत्रफळातील बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी कारवाईनंतर घटनास्थळाची पाहणी केली. शहराच्या बाजूने जाणार्या इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेच्या आतील बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याचा आदेश हरित लवादने दिला होता. या विरोधात रहिवाश्यांनी सर्वोच्च न्यालयात धाव घेतली होती. मात्र न्यायालयाने हरित लवादचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपायुक्त मनोज लोणकर, सीताराम बहुरे, राजेश आगळे, सह शहर अभियंता नितीन देशमुख, संजय खाबडे, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, अमित पंडित, अजिंक्य येळे, पूजा दूधनाळे, श्रीकांत कोळप, किशोर ननावरे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, महेश वाघमोडे, नाना मोरे, कार्यकारी अभियंता सूर्यकांत मोहिते, सुनील बागवानी, विजय सोनवणे, लक्ष्मीकांत कोल्हे, विजय वायकर, शिवराज वाडकर, सुनीलदत्त नरोटे,



यांच्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी कारवाई केली. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाचे पोलिस उपआयुक्त डॉ. शिवाजी पवार, बापूसाहेब बांगर, साहाय्यक पोलिस आयुक्त अनिल कोळी, राजेंद्रसिंह गौर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली परिसरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेच्या आत बांधण्यात आलेल्या आरसीसी बांधकामांमुळे पावसाळयात नदीला पूर येतो. त्यामुळे तेथील नागरिकांना यांचा मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे नदी काठची बेकायदा बांधकामे हटविण्यासाटी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि धडक कारवाई पथकांमार्फत ३६ बंगल्यावर कारवाई करण्यात आली. अतिक्रमण निर्मूलन धडक कारवाई पथकामध्ये ७ कार्यकारी अभियंता, २२ कनिष्ठ अभियंता, २२ बीट निरीक्षक, १६८ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, ४०० पोलिस आणि १२० मजूर सहभागी झाले होते. १५ पोकलेन, ३ जेसीबी यांचा वापर करण्यात आला. शिवाय २ अग्निशमन वाहने आणि ४ रुग्णवाहिका, कारवाईच्या चित्रीकरणासाठी १९ व्हिडीओग्राफर देखील आले होते. महापालिका यंत्रणेसह पोलिस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचार्यांनी कारवाईत भाग घेतला..

# भुयारी मेट्रोची मोबाईल सेवा कंपन्यांकडून बंद

■ मुंबई : मेहुल गायकवाड

मेट्रो ३ भुयारी मार्गिकेवरील नेटवर्क अचानक बंद पडल्याने मेट्रो प्रवासी अडचणीत सापडले आहेत. वोडाफोनने सेवा पूर्ववत केली असली तरी जिओ आणि एअरटेलने अद्याप नेटवर्क बंदच ठेवले आहे. एमएमआरसी भरमसाट शुल्क आकारत असल्याचे कारण देत काही दिवसांपासून जिओने भुयारी मेट्रोमधील नेटवर्क सेवा बंद केली आहे. तरी, प्रवाशांकडे वोडाफोन आणि एअरटेलचा पर्याय होता. पण त्यानंतर या कंपन्यांनीही अचानक सेवा बंद केली. त्यामुळे प्रवाशांच्या अडचणीत वाढ झाली. भुयारी मेट्रोच्या आवारात प्रवेश करताच फोनचे नेटवर्क जात आहे. मेट्रोने प्रवास करतानाही प्रवाशांना फोनवर बोलता येत नाही व इंटरनेटही वापरता येत



नाही. तसेच ऑनलाईन तिकीट काढणे शक्य नसल्याने कागदी तिकिटांचा वापर करावा लागत आहे. नेटवर्क सेवेसाठी आवश्यक तांत्रिक सुविधा पुरवण्यासाठी एमएमआरसीने मार्च २०२४ मध्ये निविदा प्रक्रिया राबवली होती. त्याद्वारे एसीईएस या कंपनीला कंत्राट देण्यात आले. या कंपनीने पुरवलेल्या यंत्रणेचा वापर करून जिओ, वोडाफोन, एअरटेल या कंपन्या नेटवर्क सेवा देत होत्या. मात्र अचानक या कंपन्यांनी सेवा खंडित केली. या कंपन्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करता येईल का, याबाबत चाचपणी सुरू आहे. दरम्यान वोडाफोनने आपली सेवा शनिवारी पूर्ववत केली असून यामुळे प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

# बैलगाडा शर्यतीप्रकरणी आढळराव पाटील यांच्यासह ६७ जणांची निर्दोष मुक्तता

■ पुणे : अभिजीत येरल्लू

उत्तर पुणे जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या बैलगाडा शर्यती बंद पडल्या होत्या. शर्यती पूर्ववत सुरू व्हाव्यात या मागणीसाठी २० वर्षापूर्वी मंचर येथे केलेल्या आंदोलनात खासदार शिवाजीराव आढळराव पाटील सह माजी खासदार (स्व) किसनराव बाणखेले व एकूण ६७ बैलगाडा मालक व शेतकऱ्यांच्या विरोधात मंचर पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. खेड सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए.एस.सय्यद यांनी सबळ पुराव्या अभावी खासदार शिवाजीराव आढळराव पाटीलसह सर्व बैलगाडा मालकांची सबळ पुरावा अभावी निर्दोष मुक्तता केली आहे. यावेळी बैलगाडा मालक व आढळराव पाटील यांनी एकमेकांना पेढे भरून जल्लोष साजरा केला. आढळराव पाटील म्हणाले,सन २००५



मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकात बैलगाडा मालक व शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचे नेतृत्व मी व किसनराव बाणखेले यांनी केले होते. वीस वर्षात मी ६७ वेळा न्यायालयात हजर राहिलो. सर्व आंदोलक शेतकरी न्यायालयात एकाच वेळी हजर राहणे जमत नव्हते त्यामुळे खटला लांबणीवर पडला. मी पुढाकार घेतला. सर्वांची ओळख परेड झाली सबळ पुराव्या अभावी आमची निर्दोष मुक्तता झाली. २० वर्षानंतर आमच्या लढ्याला यश आले. गुन्हा दाखल झालेल्यांपैकी १५ जणांचा मृत्यू झाला आहे.

# खासदार शिष्टमंडळ; दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णूतेचा संदेश विविध देशात पोहोचवणार

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारत सरकार या महिन्याच्या अखेरीस विविध देशांमध्ये आपले शिष्टमंडळ पाठवणार आहे. दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताची भूमिका मांडण्यासाठी आणि पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर कोंडीत पकडण्यासाठी खासदार, नेते, राजदूत यांचे ७ शिष्टमंडळ जगभर प्रवास करणार आहेत. केंद्र सरकारने शिष्टमंडळात समाविष्ट असलेल्या सर्व खासदारांची नावे देखील जाहीर केली आहेत. प्रत्येक शिष्टमंडळात खासदार आणि राजनयिकांसह ७-८ लोक आहेत, प्रत्येक शिष्टमंडळ ४-५ देशांना भेट देणार आहे. या माध्यमातून भारत जागतिक स्तरावर दहशतवादाविरुद्धचा 'शून्य सहनशीलते'चा संदेश पोहोचवणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारांची आणि त्यात समाविष्ट असलेल्या इतरांची यादी जाहीर केली आहे.

- सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या पहिल्या गटात ७ खासदार आहेत. भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालील हे शिष्टमंडळ सौदी अरेबिया, कुवेत, बहरीन आणि अल्जेरियाचा प्रवास करतील. या गटात भाजप खासदार निशिकांत दुबे, एस फांगनॉन कोन्याक, रेखा शर्मा, एआयएमआयएम खासदार असदुद्दीन ओवेसी, सतनाम सिंह संधू, गुलाम नबी आझाद यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत राजदूत हर्षवर्धन श्रृंगला असतील.
- भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील खासदारांचा दुसरा गट यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोप, इटली आणि डेन्मार्कला भेट देईल. यामध्ये भाजप खासदार डी. पुंडेश्वरी, शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, खासदार गुलाम अली खटाना, काँग्रेस खासदार डॉ. अमर सिंह, भाजप खासदार समिक भट्टाचार्य, एम. जे. अकबर यांचा समावेश असेल. त्यांच्यासोबत राजदूत पंकज सरन असतील.
- खासदारांचा तिसरा गट जदयू खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखाली इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल. यामध्ये भाजप खासदार अपराजिता सारंगी, तृणमूल काँग्रेसचे खासदार युसूफ पठाण, भाजप खासदार ब्रिजलाल, माकपचे खासदार डॉ. जॉन ब्रिटास, भाजप खासदार




प्रदान बरुआ, हेमांग जोशी आणि काँग्रेस नेते सलमान खुर्शीद यांचा समावेश आहे. या गटात राजदूत मोहन कुमार असतील.

- शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खासदारांचा चौथा गट युएई, लायबेरिया, काँगो, सिएरा लिओनला भेट देईल. या गटात भाजप खासदार बासुरी स्वराज, आययूएमएल खासदार ईटी मोहम्मद बशीर, भाजप खासदार अतुल गर्ग, बीजद खासदार सस्मित पात्रा, भाजप खासदार मनन मिश्रा आणि माजी खासदार एसएस अहलुवालिया यांचा समावेश आहे. या गटात राजदूत सुजन चिनॉय देखील असतील.
- काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली खासदारांचे पाचवे शिष्टमंडळ अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देणार आहे. यामध्ये लोजप खासदार शांभवी, झामुमो खासदार डॉ. सरफराज अहमद, तेदेप खासदार जी. एम. हरीश बालयोगी, भाजप खासदार शशांक मणी त्रिपाठी, भुवनेश्वर कलिता, शिवसेना खासदार मिलिंद देवरा, भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांचा समावेश असेल. या गटात राजदूत तरनजीत सिंग संधू असतील.
- द्रमुक खासदार के. कनिमोझी यांच्या नेतृत्वाखालील खासदारांचा सहावा गट स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशियाला भेट देईल. या गटात सपा खासदार राजीव राय, नॅशनल कॉन्फरंसचे खासदार मियां अल्ताफ अहमद, भाजप खासदार कॅप्टन ब्रजेश चौटा, राजद खासदार प्रेमचंद गुप्ता, आप खासदार अशोक कुमार मित्तल यांच्या नावांचा समावेश आहे. या गटात राजदूत मंजीव एस पुरी आणि जावेद अश्राफ यांचा समावेश असेल.
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली खासदारांचा सातवा गट इजिप्त, कतार, इथिओपिया, दक्षिण आफ्रिकेला जाईल. या गटात भाजप खासदार राजीव प्रताप रुडी, आप खासदार विक्रमजीत सिंह, काँग्रेस खासदार मनीष तिवारी, भाजप खासदार अनुराग ठाकूर, तेदेप खासदार लवू श्रीकृष्ण देवरायालू, आनंद शर्मा, व्ही मुरलीधरन यांचा समावेश असेल. या गटात राजदूत सय्यद अकबरुद्दीन यांचाही समावेश असेल.

## संक्षिप्त

### कांद्याच्या दरात घसरण; ग्राहकांना दिलासा, पण शेतकरी हवालदिल

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात अलीकडे मोठी घसरण झाली असून ग्राहकांना दिलासा मिळाल्याचे चित्र असले तरी शेतकऱ्यांसाठी ही स्थिती हवालदिल करणारी ठरत आहे. वाढलेले उत्पादन, साठवणुकीतील मर्यादा आणि पुरवठा अधिक झाल्याने बाजारात कांद्याचे दर कोसळले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर बसत आहे. नाशिक, सोलापूर,



अहमदनगर तसेच मध्य प्रदेशातून उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने एपीएमसी बाजारात दर घसरले असून, सध्या कांदा क्विंटलमागे ८०० ते १७०० रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. काही भागांत उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. 'एका एकर कांद्याच्या उत्पादनासाठी ३० ते ३५ हजार रुपये खर्च येतो. मात्र बाजारभाव केवळ १००० ते १२०० रुपये क्विंटलमागे असल्याने तोट्याचे प्रमाण वाढत आहे,' अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या वाटेवर आहेत. केंद्र सरकारने १ एप्रिल २०२५ पासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे बाजारपेठेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती.

### पावसाळयापूर्वी रस्ते, नाले, लहान पुलांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन

■ पनवेल: पल्लवी कदम

पनवेल महापालिकेने पालिका हद्दीत सुरू असलेली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने पनवेलच्या ग्रामीण भागात हाती घेतलेली रस्ते, नाले आणि लहान पुलांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन केल्याची माहिती दिली. ३१ मेपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि २५ मे पूर्वी पनवेल महापालिकेने या तारखापूर्वी ही कामे पू र्ण करण्यासाठी कंत्राटदार कंपनीला तशा सूचना दिल्याचे सुद्धा अधिका-यांनी स्पष्ट केले.




सार्वजनिक बांधकाम विभागाचे सध्या वावंजा ते चिंध्रण गावापर्यंत काम सुरू आहे. तसेच टेंभोडे ते वलप मार्गामध्ये तीन ठिकाणी लहान पुलांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. चार दिवसांपूर्वी पडलेल्या पावसात कोळवाडी येथील लहान पुलाचे काम सुरू असल्याने रस्ता शेतातून वळवला आहे. अचानक पडलेल्या पावसाच्या पाण्यामध्ये येथे चिखल झाला आणि दोन दुचाकींची चाके त्या चिखलात घसरून चालक पडले. पडलेल्यांमध्ये एक दुचाकीस्वार पोलीस होते. अशाच पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागाने वावंजे ते चिंध्रण या मार्गावर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम हाती घेतले आहे.